# रसराज

३७-५७६९



MASS

**श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड**

## स्थानिक नियामक समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. वसंतराव सावंत | अध्यक्ष |
| २) | ,, अमृतराव राणे | सदस्य |
| ३) | ,, प. रा. जोशी | ,, |
| ४) | ,, मुरलीधर जोशी | ,, |
| ५) | ,, गु. शां. शिरसाट | ,, |
| ६) | ,, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ७) | ,, प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८) | ,, प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| ९) | ,, एम्. व्ही. लेले | कर्मचारी प्रतिनिधी |

**श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड**

## विद्यार्थी महामंडळ १९८५–८६

| | | |
|---|---|---|
| १) | जनरल सेक्रेटरी | दिलीप जोशी |
| २) | विद्यार्थिनी प्रतिनिधी | कु. पद्मजा पारकर |
| ३) | पाश्चात्य खेळ | जितेंद्र उपरकर |
| ४) | भारतीय खेळ | शिवाजी कांदळगांवकर |
| ५) | 'रसराज' भित्तीपत्रक | विलास कांबळी |
| ६) | सांस्कृतिक मंडळ | वैभव बिडये |
| ७) | प्लॅ. फोरम व गायडन्स | रविकांत झरकर |
| ८) | वादविवाद मंडळ | राजन ढोके |
| ९) | नियोजन व प्रसिद्धि | अविनाश खडपकर |
| १०) | सहल विभाग | संजय खडपे |
| ११) | वाङमय मंडळ | पद्माकर जोशी |
| १२) | विविधा व्यासपीठ/आस्वाद | दिलीप जोशी, कु. पद्मजा पारकर |

## संपादकीय

रसराजचा हा सहावा अंक सादर करीत असताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यंदा काही वैशिष्ट्यपूर्ण यश प्राप्त केले. त्याचा येथे उल्लेख करणे जरुरीचे आहे.

विवेकानंद केंद्र मुंबईच्या महिला विभागातर्फे घेण्यात आलेल्या राज्यपातळीवरील निबंध स्पर्धेत जिल्हास्तरावरील ग्रामीण कनिष्ठ महाविद्यालय गटात सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिले तीनही क्रमांक अनुक्रमे अलका मालशे, संगीता नेने व हेमलता ठाकूर देसाई या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मिळविले. त्याचप्रमाणे क्रीडा क्षेत्रात देखील विद्यार्थ्यांनी वेळोवेळी असेच यश मिळविले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक समस्यांशी संपर्क येतो. ते देखील या देशातील व समाजातील नवप्रवाहात तितक्याच उत्कटतेने सहभागी होऊ शकतात. याचा अनुभव प्रस्तुत अंकातील विविध लेख विषयांकडे बघितल्यावर यावा. पद्मश्री बाबा आमटे यांच्या कार्यावरील लेख, मुस्लिम कायदा (शाहबानो), हॅलेचा धुमकेतू, श्रीलंकेतील वांशिक समस्या इ. विविध विषयांवरून नजर फिरविल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या देखील सामाजिक जाणिवा रुंदावल्या आहेत याची जाणीव होते. सामाजिक, राजकीय, आर्थिक, ऐतिहासिक, भौगोलिक, ललित व काव्य इ. सर्व विषयांना स्पर्श करणारे साहित्य देण्याचा अल्पसा प्रयत्न आम्ही या अंकात केला आहे.

रसराजच्या अंकाची सुबक व आकर्षक छपाई करण्याचे काम कोल्हापूरच्या आनंद मुद्रणालयाने स्वीकारून आम्हांस उत्तम सहकार्य केले. जाहिरातदार बंधूंच्या सहाय्यानेच आम्ही अंक नीटनेटका करू शकलो. महाविद्यालयातील प्राध्यापक व सहकारी यांच्या मौलिक सूचना व विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादामुळेच अंक नेटका ठरतोय हे नमूद करणे आवश्यक आहे. या सर्वांचे आम्ही आभार मानून ' रसराज ' आपल्या हाती देत आहोत.

**– संपादक**

# सहवेदना

मज अधिक रहाया नको
तू आग्रह आता करू ।
कारण या जगतातला
मी केवळ यात्रेकरू ।।

१९८५–८६ या शैक्षणिक वर्षात व्ही. बी. कर्णिक, अभिनेते संजीवकुमार, सुप्रसिद्ध नाटककार मधुसूदन कालेलकर, सर्वोदयी नेते दादा धर्माधिकारी, विख्यात उद्योगपती श्रीकांत किर्लोस्कर, प्रसिद्ध मराठी कवी यशवंत, चित्रपट सृष्टीतील जुने व जाणकार निर्माते, दिग्दर्शक जे. बी. एच्. वाडिया, श्रेष्ठ साहित्यिक व क्रांतीकारक श्री. माधवराव बागल, ' कॉमर्स ' चे संपादक व अर्थतज्ज्ञ श्री. वाडीलाल डगली, सुप्रसिद्ध हिंदी कादंबरीकार गुलशन नंदा, गोहरा बाई, सुप्रसिद्ध साऊंड रेकॉर्डीस्ट मंगेश देसाई, एअर चीफ मार्शल एल. एम्. कात्रे, लोकसभेचे सदस्य ललित माकन, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध राजकारणी श्री. बाबुराव काळे, जनसंघाचे माजी अध्यक्ष श्री. देवप्रसाद घोष, सर्वोच्च न्यायालयाचे जेष्ठ न्यायमूर्ती श्री. फाजल अली, बेळगावचे स्वातंत्र्यसैनिक श्री. अनंतराव याळगी, जेष्ठ गांधीवादी नेते प्रभुदास पटवारी, कसोटीपटू रामनाथ केणी, अकाली दल नेते संत हरचंदसिंग लोंगोवाल, दिल्ली महानगरपरिषदेचे श्री. अर्जुनसिंग, जेष्ठ हिंदी कवी श्री. भवानीप्रसाद मिश्रा, नाटककार अनिल बर्वे, रंगभूमीवरील सुप्रसिद्ध अभिनेते डॉ. काशिनाथ घाणेकर, पत्रकार बी. के. तिवारी, पत्रकार जयंती शुक्ला व श्री. ठाकूर, महाविद्यालयाशी संबंधित संस्थेचे सदस्य डॉ. एम्. आर. पोकळे, महाविद्यालयातील प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गात शिकणारा विद्यार्थी रविकांत पवार आणि कनिष्क विमानातील सर्व दुर्दैवी प्रवासी व इतर ज्ञात–अज्ञातांचे दुःखद निधन झाले. **महाविद्यालयाची त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली !**

# अंतरंग

**ब्लॉकमेकर** : मास ॲडव्हरटायझींग, कोल्हापूर.
**छायाचित्रे** : रामदास फोटो स्टुडिओ, देवगड
**मुखपृष्ठ कल्पना** : युवक वर्षाच्या निमित्ताने– संपादक मंडळ
**संपादकीय** : प्रा. प्रकाश उपाध्ये


| | | |
|---|---|---|
| बळी | वनिता गुरव | १ |
| यांच्या दु:खाची जातच वेगळी | अश्विनी कुलकर्णी | ३ |
| शिक्षण–काल : आज : उद्या | अलका मालशे | ५ |
| रविकिरण मंडळातील अखेरचा तारा निखळला | निलीमा भिडे | ९ |
| गंध हिरव्या निसर्गाचा | विजय खवळे | ११ |
| मालवणचा सिंधुदुर्ग किल्ला | संध्या भिडे | १३ |
| मराठी रंगभूमीवरील झंझावात : डॉ. काशिनाथ घाणेकर | संगीता नेने | १८ |
| जागतिक कीर्तीचे महान तत्त्वचिंतक : जे. कृष्णमूर्ती | सतीश धूरत | १९ |
| बाबा आमटे : एक महान कर्मयोगी | विनिता पोकळे | २१ |
| शाहबानो प्रकरण आणि मुस्लिम समाज | श्रीप्रभा राजेशिर्के | २३ |
| श्रीलंकेतील वांशिक समस्या | अविनाश खडपकर | २५ |
| भौगोलिक सहल : सुखद अनुभूती | अंजली नलावडे | २७ |
| देवगड पवनचक्की | वासंती राऊत | २९ |
| हॅलेचा धूमकेतू | प्रवीणा सावंत | ३१ |
| भारतीय बँक व्यवसायाचा आराखडा | प्रसाद मोंडकर | ३३ |


**काव्यसुमनांजली**


| | | |
|---|---|---|
| कधी वाटते | चित्ररेखा पाटणकर | ३७ |
| अशी सकाळ | चित्ररेखा पाटणकर | ३७ |
| काय करावे हे ना कळते | विलास कांबळी | ३८ |
| जीवन | सोनू मालवणकर | ३८ |
| चंदेरी रात | विलास कांबळी | ३८ |
| वृक्ष | सोनू मालवणकर | ३९ |
| अभाग्याचे दु:ख | राजन ढोके | ३९ |


**ENGLISH SECTION**


| | | |
|---|---|---|
| Angels of 21 st Century : Computers | Padmaja Parkar | 41 |
| Frustration | Madhuri Nene | 45 |
| 'Actor, Actor' | Anagha Kulkarni | 47 |
| Mortal | Ashwini Kulkarni | 47 |
| Knowledge ! The Glorious Lamp of Heaven | Shriprabha Rajeshirke | 47 |
| वाटचाल | | ५७ |
| पारितोषिके | | ६७ |

शिक्षण विकास मंडळ, देवगड

# नियामक समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. शां. कृ. पंतबालावलकर | अध्यक्ष |
| २) | ,, | के. जे. ठाकूर | उपाध्यक्ष |
| ३) | ,, | अर्जुनराव नलावडे | उपाध्यक्ष |
| ४) | ,, | वसंतराव साटम | कार्यवाह |
| ५) | ,, | अमृतराव राणे | सहकार्यवाह |
| ६) | ,, | मुरलीधर जोशी | सभापती, नियामक समिती |
| ७) | ,, | डॉ. अरुण खाडिलकर | कोषाध्यक्ष |
| ८) | ,, | स. ज. पारकर | सभासद |
| ९) | ,, | य. द. राणे | ,, |
| १०) | ,, | ह. अ. नलावडे | ,, |
| ११) | ,, | ल. य. कोयंडे | ,, |
| १२) | ,, | डॉ. मा. रा. नेने | ,, |
| १३) | ,, | य. ग. पोकळे | ,, |
| १४) | ,, | रा. धों. पारकर | ,, |
| १५) | ,, | पु. ज. ओगले | ,, |
| १६) | ,, | प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| १७) | ,, | स. भि. जामसंडेकर | ,, |
| १८) | ,, | डॉ. वा. कृ. आपटे | ,, |
| १९) | ,, | गु. शां. शिरसाट | ,, |
| २०) | ,, | भा. गो. पाटणकर (श्री. भाऊसाहेब केळकर यांचे प्रतिनिधी) | ,, |
| २१) | ,, | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | निमंत्रित |
| २२) | ,, | आ. गो. बांबुळकर | निमंत्रित |
| २३) | ,, | श. ज. कुलकर्णी | निमंत्रित |
| २४) | ,, | प्राचार्य अ. ना. जोशी | निमंत्रित |

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

## आमचा प्राध्यापक वर्ग

### १९८५-८६

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य आर्. ए. कुलकर्णी एम्. ए. | (इंग्रजी, मराठी) |
| २) | प्रा. पुरूषोत्तम शां. गोठोस्कर एम्. ए. | (इंग्रजी) |
| ३) | ,, ल. दा. गोलतकर एम्. ए. बी. एड्. | (इतिहास) |
| ४) | ,, मधुकर म. गावडे एम्. ए. बी. एड्. | (भूगोल) |
| ५) | ,, हेरंभ ल. पटवर्धन एम्. कॉम्. सी.ए. | (अकौटन्सी) |
| ६) | ,, टी. सेल्व्हराज एम्. ए. बी. एड्. | (अर्थशास्त्र) |
| ७) | ,, सुरेश मु. सोनटक्के एम्. ए. | (अर्थशास्त्र) |
| ८) | ,, दत्तात्रय बा. बलवान एम्. कॉम्. | (कॉमर्स) |
| ९) | ,, भारत ना. भोसले एम्. एस्. सी. | (संख्याशास्त्र) |
| १०) | ,, अरुण श्री. गोगटे बी. ए. एल्. एल्. बी. | (कायदा) |
| ११) | ,, श्रीकृष्ण शं. बोराटे एम्. ए. बी. एड्. | (भूगोल) |
| १२) | ,, एम्. व्ही. पाटील एम्. कॉम्. | (कॉमर्स) |
| १३) | ,, रवींद्र ज. बोरसे एम्. ए. | (भूगोल) |
| १४) | ,, विनायक अ. पाटील एम्. ए. बी. एड्. | (इतिहास) |
| १५) | ,, शिवाजी शा. पाटील एम्. ए. | (अर्थशास्त्र) |
| १६) | ,, प्रकाश म. उपाध्ये एम्. ए. डी. एच्. ई. | (इंग्रजी) |
| १७) | ,, शाम सा. पाटील एम्. कॉम्. डी. एच्. ई. | (कॉमर्स) |
| १८) | " बजरंग म. माळी एम्. ए. बी. पी. एड्. | (इतिहास) |
| १९) | ,, एम्. जी. शिर्के एम्. कॉम्. डी. एच्. ई. | (कॉमर्स) |
| २०) | ,, प्रवीण बी. सकटे एम्. ए. | (भूगोल) |
| २१) | ,, लता वळसंगकर एम्. ए. बी. एड्. | (मराठी) |
| २२) | " आर्. जी. जाधव एम्. ए. | (अर्थशास्त्र) |
| २३) | ,, बी. एस्. पोवार एम्. ए. डी. एच्. ई. | (भूगोल) |
| २४) | ,, मोरेश्वर ना. जोशी एम्. कॉम्. डी. एच्. ई. | (कॉमर्स) |

### ग्रंथालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एस्. एस्. पाटील एम्. ए. बी. लिब्. एस्सी. | (ग्रंथपाल) |
| २) | ,, यशवंत तुकाराम देऊलकर | (मुख्य शिपाई) |

### कार्यालय

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गणेश भालचंद्र गोडबोले | (अधीक्षक) |
| २) | ,, महेश्वर वा. लेले | (मुख्य लिपिक) |
| ३) | कु. पद्माक्षी तारकर बी. कॉम्. | (लिपिक) |
| ४) | ,, मंदा चौकेकर बी. ए. | (लिपिक) |
| ५) | श्री. डी. जी. किरकिरे बी. ए. | (लिपिक) |

### शिपाई

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत यशवंत महाडीक | |
| २) | ,, वसंत वासुदेव धोपटे | |
| ३) | ,, नामदेव दामाजी केतकर | |
| ४) | ,, चंद्रकांत साबाजी कदम | |
| ५) | ,, अनंत कृष्णा बाणे | (रखवालदार) |

Statement about ownership & other particulars about the periodical

# RASRAJ

Form IV ( Rule 8 )

| | | |
|---|---|---|
| 1) | Place of publication : | Devgad |
| 2) | Periodicity of its publication : | Yearly |
| 3) | Printer's Name.<br>Nationality,<br>Address : | Mr. Govindrao M. Chougale<br>Indian<br>T. P. Scheme No. 98/2, Kolhapur |
| 4) | Publisher's Name.<br>Nationality :<br>Address : | Prin. R. A. Kulkarni<br>Indian<br>Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad. |
| 5) | Editor's Name :<br>Nationality :<br>Address : | Prof. Prakash Upadhye.<br>Indian<br>Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad |
| 6) | Ownership of Publication : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad |

I, R. A. Kulkarni, hereby declare that the particulars given above are true to the best of my Knowledge and belief.

Sd. R. A. Kulkarni
Signature of Publisher

---


प्रकाशक : प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, संपादक : प्रा. प्रकाश उपाध्ये
मुद्रक : आनंद प्रिंटिंग प्रेस, टी. पी. स्कीम नं. ९८/२ दुधाळी, कोल्हापूर.
या अंकातील लेखकांच्या मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच, असे नाही.
FOR PRIVATE CIRCULATION ONLY

....आमचे स्फूर्तीस्थान....



**माननीय श्री. शां. कृ. तथा**
**बापूसाहेब पंतवालावलकर**
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड.


**जीवेत शरदः शतम्**



**प्राचार्य आर. ए. कुलकर्णी**

# कीर्ती पताका . . .

**दिलीप जोशी**



जनरल सेक्रेटरी

**पद्मजा पारकर**



विद्यार्थिनी प्रतिनिधी व
सिनियर जनरल चँपियन।

**अविनाश खडपकर**




विद्यापीठ प्रतिनिधी

**विजय खवळे**



सिनियर जनरल चँपियन

**श्रीकांत बिडये**




ज्युनियर जनरल चँपियन

**विद्याधर जुवाटकर**




पोहणे जिह्यात प्रथम
विभागीय निवड.

**शिवाजी कांदळगांवकर**



**प्रदीप खवळे**



महाराष्ट्र शासन ग्रामीण कबड्डी स्पर्धेमध्ये
विभागीय पातळीवर सहभाग.

## रसराज संपादक मंडळ



विलास कांबळी



विजय खवळे



सतीश धुरत



प्रसाद मोंडकर



तुळसीदास डामरी



प्रा. प्रकाश उपाध्ये



प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर



प्रा. विनायक पाटील



कु. श्रीप्रभा राजेशिर्के



कु. माधुरी जोशी

## प्रथम वर्ग सन्मान



कु. कामिनी जोशी



कु. इंदुमती परांजपे



कु. अनघा कुलकर्णी



कु. पिरोज जाचक



शामसुंदर खेडेकर



अविनाश घाडी



श्रीपाद पारकर



श्रीकृष्ण ठाकूर



अनिल सारंग



बिनोद चिंदरकर

१२ वी वाणिज्य व कला प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

# वर्ग प्रतिनिधी विद्यार्थी महामंडळ

दिलीप जोशी, अविनाश खडपकर, पद्मजा पारकर, राजन ढोके, विलास कांबळी, रवींद्र झरकर, वैभव बिडये




तृतीय वर्ष वाणिज्य, तृतीय वर्ष कला, द्वितीय वर्ष वाणिज्य, द्वितीय वर्ष कला, द्वितीय वर्ष वाणिज्य, प्रथम वर्ष कला, प्रथम वर्ष वाणिज्य

शिवाजी कांदळगांवकर, संजय खडपे, पदमाकर जोशी, जितेंद्र उपरकर



बारावी कला, बारावी वाणिज्य, अकरावी कला, अकरावी वाणिज्य

# राष्ट्रीय सेवा योजना–विद्यार्थी समिती



विजय खवळे, नारायण उपरकर, सूर्यकांत पाळेकर, मेहबूब खान, शुभांगी नलावडे, प्रवीणा सावंत

# बळी

कु. वनिता गुरव
१२ वी वाणिज्य

नीता बेशुद्ध पडली होती. ती शुद्धीवर येण्यासाठी सारेजण प्रयत्न करीत होते. वैद्यकीय उपचार चालू होते. तथापि, नीता शुद्धीवर येण्याची शक्यता कमी होती. अखेर या प्रयत्नास यश आले. तिने डोळे किलकिले करून सभोवती पाहिले. पोलीस तिला प्रश्न विचारण्यास पुढे सरसावले, " तू कशी भाजलीस हे आम्हाला समजले आहे. तेव्हा तू कोणालाही न घाबरता निःशंकपणे तुला कोणी भाजले ते सांग "हवालदार पाटील म्हणाले.

नीता शेवटचे क्षण मोजत होती. तिने रमेशकडे पाणावलेल्या डोळ्यांनी पाहिले. तिच्या तोंडातून अस्पष्ट शब्द बाहेर पडले, " मी . . रात्री. . . जेवण . . करीत असताना स्टोव्हला . . . पदर लागून . . . भाजले " आणि तिचे डोळे मिटले गेले, ते कायमचेच. रमेशने हंबरडा फोडला. पण त्याचा काहीच उपयोग नव्हता. कारण तिच्या मरणाला तोच जबाबदार होता.

नीता व रमेशचे लग्न एक वर्षापूर्वी झाले होते. पहिले सहा महिने बरे गेले, पण पुढे नीताजवळ रमेशच्या वडिलानी दहा हजार रुपयांची मागणी केली. तसे पाहता रमेशला कशाचीच कमतरता नव्हती. तो चांगल्या कंपनीत अधिकारी म्हणून नोकरी करीत होता. त्याला आपली स्कूटर असावी असे वाटे. पण ती ही तो दोन वर्षात घेऊ शकला असता, पण नीताने आपल्या वडिलांकडून दहा हजार रुपये आणावेत असा हट्ट त्याच्या वडिलानी धरला. रमेशला हे पटत नव्हते. नीताचे वडील दहा हजार रुपये देऊ शकणार नाहीत हे दोघांनाही माहीत होते.

नीताचे वडील हे कचेरीत कारकूनची नोकरी करीत होते. त्यांच्या घरची परिस्थिती दोन वेळा पोटभर खाण्याइतपत होती पण दहा हजार रुपये देण्याइतपत नव्हती. कुठे कर्ज काढावे तर नीताच्या लग्नाचे कर्ज अजून फिटायचे होते. नीताची पाठची बहीणही लग्नाच्या वयाची होती. नीताच्या लग्नाच्या वेळी तिच्या सासऱ्यानी आम्हाला हुंडा नको पण दहा–पंधरा तोळे सोने घातले तरी चालेल बाकी तुमचं काही नको आणि यापुढे येणार नाही असे सांगितले होते. तेव्हा नीताच्या आईने अंगावर फक्त मंगळसूत्रातील दोन डवल्या ठेवून बाकीचे सर्व दागिने नीताच्या अंगावर घातले होते आणि आता दहा हजारांची मागणी ऐकताच त्यांना धक्का बसला. नीताच्या वडिलानी तिच्या सासऱ्याची खूप विनवणी केली पण सासरेबुवा काही ऐकण्यास तयार नव्हते.

रमेशच्या वडिलाना नीताचे वडील पैसे देऊ शकणार नाहीत हे माहीत होते. तरीही ते पैशाची मागणी करीत होते. कारण शेजारचे बंडूतात्या. बंडूतात्यांचा मुलगा हा कारकून असून आपल्या समोरून तो दररोज ऐटीत स्कूटर घेवून जात असे. अर्थात ती स्कूटर बंडूतात्यांच्या सुनेच्या माहेरून मिळाली होती. पण हे रमेशच्या वडिलाना खपत नसे. आपला मुलगा चालत कामाला जातो हे त्यांच्या मनाला पटत नव्हते. वडिलांच्या सांगण्यामुळे रमेशला आपली स्कूटर असावी असे वाटू लागले आणि नीताच्या वडिलाकडून पैसे मिळणार नाहीत याची त्याला खात्री होती. एक दिवस रमेशचे वडील रमेशला म्हणाले, ' तुला स्कूटर पाहिजे ना ? तर मी सांगेन तसे वाग.' त्याने मानेने होकार दिला.

" आज रात्री झोपतेवेळी नीताच्या कपड्यांना आग लावण्याचे नाटक कर, अर्थात तिला खरोखर भाजायचे

नाही'' रमेशचे वडील म्हणाले. हे ऐकताच रमेश हादरला. आपल्या वडिलांचा करारी आवाज व चेहरा पाहू लागला. रमेशचे नीतावर फार प्रेम होते. तो असे करण्यास तयार नव्हता पण वडिलापुढे नाईलाज होता.

आणि त्या रात्री नीता झोपली असताना तिच्या साडीच्या पदराला काडी लावली. काही कळायच्या आत तिच्या अंथरुणाने पेट घेतला. तिला ताबडतोब दवाखान्यात नेण्यात आले पण त्याचा काही उपयोग झाला नाही. रमेश हे कसे घडले याचे आश्चर्य करू लागला.

केवळ एका स्कूटरसाठी वडिलांचे ऐकून आपण आपल्या अर्धांगीचा बळी घेतला याचेच त्याला मनस्वी दुःख झाले. त्या दिवसापासून तो उदास वागू लागला. त्याने आपल्या हातून झालेल्या चुकीचा जणू धसकाच घेतला होता.

‡ ‡ ‡


'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !

**फडके रेडिओ अॅन्ड इलेक्ट्रिक हाऊस**

**मु. पो. वाडा, ता. देवगड**

- रेडीओ, टेपरेकॉर्डर व सर्व प्रकारच्या इलेक्ट्रिक साहित्याची विक्री व दुरुस्ती.
- मोटार सायकल, स्कूटर स्पेअर पार्टस्चे विक्रेते
- पी. व्हि. सी. पाईप, गॅल्व्हनाईझ पाईप वगैरेचे स्टॉकीस्ट.

**प्रोप्रा० अनंत फडके**

'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !

**श्री दत्तात्रय हरि कांबळी**

**मु. पो. जामसंडे, वरवाडी देवगड**



**प्रसिद्ध आंबा बागाईतदार**

MXL – 7651

'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !

**साईप्रसाद ट्रान्सपोर्ट**

**वाडातर वाडी, ता. देवगड**



**टेम्पो भाड्याने मिळेल.**

☎ – १९

**प्रोप्रा – नितिन भाबल**

# यांच्या दुःखाची जातच वेगळी

**कु. अश्विनी कुलकर्णी**

द्वितीय वर्ष कला

' तुझ्या पदकमलांना स्पर्श करून,
मला तुला प्रणाम करावयाचा आहे.
परंतु मी कितीही खाली वाकलो तरी
हीन, दीन, दलित तळागाळातील लोकांच्या समुदायात जेथे
तुझी पाऊले उभी आहेत
तेथवर माझे हात जाऊन पोहोचू शकत नाहीत.'

रवींद्रनाथांच्या गीतांजलीतील एका गीताच्या या ओळी आहेत. दीनदलितांच्या उद्धाराविषयी भारतात चालू असलेल्या अनेक प्रयत्नांची हीच शोकांतिका आहे. म. फुले, डॉ. आंबेडकर व महर्षी कर्वे यांची थोर परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात आजही कायद्याने अवैध ठरविलेली देवदासीची अनिष्ट प्रथा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. ही गोष्ट माणुसकीला लांच्छनास्पद आहे.

## अन्यायाला वाचा फुटली

१९७५ मध्ये गडहिंग्लजला देवदासींची प्रथम परिषद झाली. देवदासी पद्धतीमुळे दरवर्षी हजारो मुली वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात ही माहिती समाजासमोर आली. आज सामाजिक चळवळीत, विशेषत: स्त्रीमुक्ती चळवळीत देवदासीच्या प्रश्नाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. देवदासी या प्रश्नावर खूप बोललं गेलं आहे, लिहिलं गेलं आहे. पण अनेकदा रूढीला कारणीभूत ठरलेली धार्मिक परिस्थिती लक्षात न घेता रूढीसंबंधी घणाघाती हल्ले केले जातात. एखाद्या ठिकाणी लाखो लोक जमतात ते केवळ अंधश्रद्धेने अशी वरवरची टीका न करता त्यांना एकत्र आणणारा एखादा धार्मिक धागा आहे. याचा विचार करणे आवश्यक आहे.

## देवदासी भोगदासी झाली

पूर्वीच्या काळी जेव्हा मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती त्यावेळी देवापेक्षा देवतांना अधिक महत्त्व होते. देवीच्या उपासनेसाठी केवळ स्त्रियांनाच मंदिरात प्रवेश होता. देवीच्या उपासनेसाठी काही स्त्रियांना राखीव ठेवले जात होते. नृत्य–संगीतासारख्या कलांची जोपासनाही ते करीत. अशा स्त्रियांनाच ' देवदासी ' म्हणत. पितृसत्ताक पद्धती आल्यानंतर या प्रथेला विकृत वळण लागले व देवदासी ही भोगदासी झाली.

या प्रथेत अनेक मुली देवाला वाहिल्या जातात. हा प्रकार अत्यंत भीषण आहे. मुलं होत नाहीत म्हणून देवाला नवस करायचा, ' ओटी उजवू दे, पहिले मूल तुला वाहीन ' आणि मग ते मूल देवाला सोडायचे. मुलगा झाला तर मुलाऐवजी गाय दिली तरी चालते. पण मुलगी झाली तर मात्र काहीच तोड नाही. कोल्हापूर–निपाणी भागात तर मुलामुलींच्या केसांचा गुंता होऊ लागला की, केस विंचरण बंद करतात. पुढे त्यात घाण साठू लागते व जटा तयार होतात. 'जट येणे म्हणजे देवाचे बोलावणे आले ' असे मानण्याचा प्रघात आहे. चांदीची जट देवाला वाहून मुलाची सुटका करता येते, पण मुलीच्या गळ्यात मात्र जोगतीणीचे ' दर्शन ' बांधले जाते. इतर मुलींप्रमाणे पुरुषांशी लग्न न करता देवाबरोबर लग्न लावून दारोदार ' जोगवा ' मागत जीवन जगावे लागते. रखेली म्हणून राहाण्याची त्यांना मुभा असते. या पद्धतीला ' झुलवा ' लावून घेणे असे म्हणतात. अशा संसारात (?) झालेली मुले ही म्हणे

'देवाची मुले !' जोगतीण मेली तरी तिच्या गळ्यातील ' दर्शन ' दुसरीच्या गळ्यात घातल्याशिवाय तिला मुक्ती मिळत नाही, असा समज आहे. यल्लम्मा देवीच्या नावाने हा व्यवहार चालतो. हल्ली तर या जोगतिणींची रवानगी थेट पुण्या मुंबईच्या कुंटणखाण्यात होते. तेथेच त्यांचे भविष्य निश्चित होते.

## देवदासी प्रथेचे मूळ : अंधश्रद्धा व दारिद्र्य

एकंदर सर्व दृष्टीने विचार केल्यास लक्षात येते की, बहुसंख्य देवदासी या मागासलेल्या वर्गातून आलेल्या आहेत. आईबाप मुलींची लग्ने करून देण्यास असमर्थ असतात. त्यांच्या दारिद्र्याचा, अज्ञानाचा व अंधश्रद्धेचा गैरफायदा वेश्यांचे दलाल घेतात. नडलेल्या बापाला पैशाचा लोभ दाखवून देवीचे ' दर्शन ' लहानग्या मुलींच्या गळ्यात अडकवतात. एकदा देवीला सोडले की मग मागे वळून बघायला मार्गच नसतो. देवदासी म्हणून शिक्का बसल्यावर पुन्हा परत गृहिणी जीवनाकडे त्यांना कधीच फिरता येत नाही. कारण देवीचा कोप होईल अशी नाहक भीती त्यांना दाखवली जाते.

१९३४ मध्ये ब्रिटिशांनी देवदासी प्रतिबंधक कायदा केला. पण अजूनही त्याची अंमलबजावणी झालेली दिसत नाही. देवदासी निर्मूलन कायद्यानंतर देवळात लग्न लावण्याचे प्रकार बंद झाले. पण मुलीच्या आई–वडिलांना भीती दाखवून घरीच हे प्रकार सर्रास होऊ लागले. याकरिता देवदासींचा प्रश्न नीट समजावून घेऊन त्यांचे पुनर्वसन होणे आवश्यक आहे. देवदासींचा प्रश्न जितका धार्मिक, सामाजिक तितकाच आर्थिकही आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या प्रश्नाकडे पाहताना त्यामागे भयानक दारिद्र्याची समस्या उभी आहे, या वास्तवतेचे भान ठेवणे आवश्यक आहे.

## आम्हाला सन्मानाने जगायचंय

अलिकडे ६–७ वर्षात या प्रथेत सापडलेल्या देवदासी स्त्रियांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होऊ लागली आहे. त्यांनाही सन्मानाने जगायची इच्छा आहे, पण समाज व मानसिक गुलामगिरी त्यांना मागे ओढत आहे.

## सामाजिक जबाबदारी

म्हाताऱ्या व अपंग देवदासी स्त्रिया स्वतःच्या चरितार्थासाठी तरुण मुलींना आपल्या जाळ्यात ओढतात. म्हणून सरकारने अशा स्त्रियांना चरितार्थाचे साधन उपलब्ध करून दिले पाहिजे. देवदासींसाठी, त्यांच्या मुलामुलींसाठी वसतीगृहे काढली पाहिजेत. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शाळा चालवून, त्यांना उद्योग काढून दिले पाहिजेत. याकरिता स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या तरुण–तरुणींची नितांत आवश्यकता आहे. अंधश्रद्धा निर्मूलन व समाज प्रबोधनाचा एक भाग म्हणून डॉ. बाबा आढाव व इतर कार्यकर्त्यांनी या प्रथेला विरोध करण्याचे धाडस केले आहे. शिवाजी विद्यापीठात बहिःशाल मंडळातर्फे व राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे जटा निर्मूलनासारखे अनेक स्तुत्य कार्यक्रम हाती घेतले गेलेत, पण त्यात सातत्य राहणे आवश्यक आहे. धार्मिक अंधश्रद्धेने वाढणारी ही प्रथा वेळीच आटोक्यात आणली नाही तर दरवर्षी ही देवदासींची संख्या वाढतच जाईल, यल्लम्माचे डोंगर धामाधूम होत त्यांना चढावे लागतील. गळ्यात ' दर्शन ' अडकवून ' जोगवा ' मागत ' झुलव्या ' सह त्यांच्या मुलांना पोसावे लागेल.

‡ ‡ ‡



# शिक्षण : काल - आज - उद्या

**कु. अलका मालशे**
११ वी वाणिज्य

' तमसो मा ज्योतिर्गमय । ' अंधाराकडून प्रकाशाकडे चला. ' मृत्यो मा अमृतं गमय । ' मर्त्य तत्त्वाकडून अमृत तत्त्वाकडे जा. भारतीय जीवनपद्धतीचा हा मूल स्त्रोत आहे. हे जरी पूर्ण सत्य असले तरी शिक्षणाच्या दृष्टिकोनातून ज्ञाताकडून अज्ञाताकडे जाणे, अज्ञाताचा शोध व वेध घेणे म्हणजे शिक्षण होय असे मी मानते. माणसाच्या शोधक वृत्तीतूनच त्याला नव्या मार्गाची दिशा सापडते.

आजच्या युगात हरवला आहे तो शिक्षणाचा सुसंघटीत निर्दोष मार्ग. शिक्षण हा महान सामाजिक प्रश्न होऊन बसला आहे. विचारवंत, तत्त्वमंथक, शिक्षणशास्त्रज्ञ आपली बुद्धिमत्ता पणाला लावून नवनवीन शैक्षणिक धोरणे कार्यान्वित करीत असतात. पण आजच्या काळात ती संपूर्णतया यशस्वी झाल्याचे प्रत्ययास येत नाही. देशाच्या एकूण स्थितीचा आणि भवितव्याचा विचार करताना शिक्षणाचा विचार अग्रक्रमाने, सर्वप्रथम होणे आवश्यक आहे. शिकणे, शाळेत जाणे, एखादी विद्या आत्मसात करण्याचा प्रयत्न करणे, एवढेच शिक्षणाचे मर्यादित उद्दिष्ट आपल्यापुढे नाही. व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधणे हाच शिक्षणाचा मूळ हेतू आहे. पण आज आपल्याला त्याचीच विस्मृती होत आहे. यासाठी पूर्वजांनी आखलेली शिक्षण पद्धती किती बिनतोड होती हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

प्राचीन काळी गुरूकुल पद्धती होती. विद्यार्थ्यांना गुरूगृही ज्ञानार्जनासाठी जावे लागत असे. अर्थार्जन एवढाच गुरूचा ज्ञानदानामागील मर्यादित हेतू नव्हता. कर्तव्यपरायणता हा सद्‌गुण गुरू व शिष्याजवळ होता. शिष्य हा सदैव गुरूच्या सहवासात असल्याने गुरूच्या उदात्त विचारांचा, त्यांच्या आचारांचा, त्यांच्यातील विविध कर्तृत्वांचा, कौशल्यांचा प्रभाव शिष्यावरती पडत असे. शुद्ध आचरण व शिस्तीचे कटाक्षाने पालन तेथे केले जात असे.

गुरूणां सन्निधौ तिष्ठेत सदैव विनयान्वित: ।
पादप्रसारणादीनि तत्र नैव समाचरेत् ।।
ही शिकवण तेथे दिली जात असे.

' क्षणश: कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत् । '
या तत्वावर ज्ञानग्रहण केले जात असे. शिष्याला माधुकरी मागण्यास लावून त्याच्यामध्ये विनयशीलता, स्वावलंबित्व निर्माण केले जात होते. गुरूची ज्ञानदानामागे कृपणता नव्हती. आपल्याला अवगत असलेले सर्व ज्ञान, विद्या तो शिष्यापर्यंत पोचवीत असे.

गुरूचे स्थान सर्वश्रेष्ठ होते. अंबारीतून जाणारे राजेरजवाडेही प्रथम आचार्यांना वंदन करीत.

गुरूर्ब्रम्हा गुरूर्विष्णु: गुरूर्देवो महेश्वर: ।
गुरू साक्षात् परब्रम्ह तस्मै श्री गुरूवे नम: ।।
मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्य देवोभव असा वंदनाचा क्रम होता. शिष्य विद्यार्जन झाल्यावर गुरूगृहातून परत जाई तो ' प्रतिगुरू ' होऊनच तेव्हाही–
यानि यानि अस्माक सुचरितानि ।
तानि तानि सेव्यानी, नो इतराणि ।।

असा संदेश दिला जात असे. कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून शिष्य यथाशक्ती गुरूदक्षिणा देत असे. गुरू हा 'पोटार्थी' नव्हता आणि शिष्य हा खऱ्या अर्थाने ' विद्यार्थी ' होता.

आजच्या शिक्षणातील प्रमुख दोष कोणता असेल तर विद्यार्थी व शिक्षक यांच्यात बाजारीपणातून निर्माण झालेली दरी होय. शाळांमधून विद्यार्थीसंख्या झपाट्याने वाढत आहे. एकेका वर्गात साठ–सत्तर विद्यार्थी. शिक्षक लक्ष तरी कुणाकुणाकडे देणार ? दिलेल्या तासिकेमध्ये आपली बडबड पूर्ण करून पुस्तक शिकवून पूर्ण करणे. थोडक्यात, ते डोक्यात कोंबणे हाच एक उद्देश शिक्षकांसमोर असतो. वैज्ञानिक प्रगतीमुळे विविध प्रकारची यंत्रेच माणसाची कामे करू लागली आहेत. माणूस यंत्रवत बनला आहे. कॅल्क्युलेटरमुळे शिक्षकालाच पाढे येत नाहीत. मग खऱ्या ज्ञानाचा आस्वाद त्यातून कसा मिळणार ? म्हणूनच सर जॉन ॲडम्स म्हणतात, "आपल्या शाळा म्हणजे माहितीवजा ज्ञानाचा पुरवठा करणारी दुकाने व शिक्षक म्हणजे ते विकणारे विक्रेते होत." ही माहितीवजा खोगीर भरती म्हणजे मूलगामी ज्ञान नव्हे. हे ज्ञान ना व्यक्तिविकासाला उपयोगी ना समाजाला.

लहान मुलांची मने ही संस्कारक्षम असतात. या वयात त्यांच्यावर चांगले संस्कार होण्याची आवश्यकता असते. आज मूल तीन वर्षांचे झाले की त्याला बालवाड्या, बालकमंदिरे, के. जी. मध्ये विद्यासंपादनार्थ पाठवले जाते. या बालसंस्थांचा उद्देश फार चांगला असतो. येथील विविध खेळांमुळे मुलांच्या मनात खेळांविषयी अभिरुची निर्माण होते. येथे आकलन शक्तीला वाव देणारे अनेक खेळसंचही शास्त्रज्ञांनी आता निर्माण केले आहेत. पण मुलाने पहिलीत गेल्यापासून जास्तीतजास्त गुण मिळवले पाहिजेत म्हणून पालक अगदी चवथ्या वर्षापासून मुलांकडून झटून अभ्यास करवून घेत असतात. या टक्केवारीच्या दैत्यामुळे मुलांपासून त्यांचे शैशव हिरावून घेतले जात आहे.

आज प्राथमिक शिक्षणाचीही तीच अवस्था आहे. शाळांत पुरेसे शिक्षक नाहीत. असलेच तर ते पूर्ण प्रशिक्षित नाहीत. खेडेगावातून पिण्याच्या पाण्याच्या सोयी नाहीत; वाचनालये, क्रीडांगणे नाहीत. अशी ही एकंदर स्थिती औदासिन्य निर्माण करणारी आहे.

माध्यमिक शिक्षणाची परिस्थिती तर याहूनही भयानक आहे. निरर्थक व बोजड अभ्यासक्रमाच्या घाण्याला विद्यार्थी जुंपला आहे. त्याच्या कुवतीबाहेरील शिक्षणाचा बोजा त्याच्यावर पडला आहे. शाळेला कोंडवाड्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक परीक्षेतील गुणांवर ठरवला जात असल्याने एका विचारवंताने म्हटल्याप्रमाणे "रणांगणावर लढण्यासाठी सैनिक तयार करावेत त्याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून परीक्षेसाठी तयारी करून घेण्यात शिक्षकवर्ग गुंतला आहे." सखोल ज्ञान मिळवण्यासाठी कोणीच धडपडत नाही. पुस्तकी शिक्षणाची व्यवहारज्ञानाशी फारकत, हा आजच्या शिक्षणपद्धतीतील प्रमुख दोष आहे. आज अनेक विषयांचे ज्ञान विद्यार्थ्याला दिले जाते परंतु त्या ज्ञानाचे उपयोजन कसे करावे याचे ज्ञान दिले जात नाही. मग 'इदं च नास्ति परं न लभ्यते।' अशी विद्यार्थ्याची अवस्था होते.

महाविद्यालयात विविध निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सहली, मनोरंजनाचे विविध कार्यक्रम, स्नेहसंमेलन, श्रमशिबीर यांसारखे स्तुत्य उपक्रम आहेत. पण येथे केवळ याचाच भपका जास्त असतो. अभ्यासाला गौणत्व दिले जाते. अभ्यासक्रमामध्ये असणारी पुस्तके ही विचारप्रवृत्त करणारी आहेत. परंतु विद्यार्थ्याला चित्रपट, फॅशन यापुढे त्याचा विसर पडतो. काही प्रमाणात आजचा विद्यार्थीही शैक्षणिक दर्जा घसरण्यास कारणीभूत आहे याची कबुली देणेच इष्ट. विद्यार्थी तासांना बसू इच्छित नाही. 'विद्या विनयेन शोभते ।' असे सुवचन सुभाषितकाराने लिहून ठेवले आहे. पण 'विद्या विनये न शोभते' । असा सोयिस्कर अर्थ तर विदयार्थ्याने लावून घेतला नाही ना ?

श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे की, 'नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । ' ज्ञानासम दुसरी पवित्र वस्तू या जगतात नाही. आजच्या एकंदरीत शिक्षणपद्धतीचा आढावा घेता ज्ञान केवळ डोक्यात कोंबण्याचे काम सुरू आहे. ज्ञानाकरिता ज्ञान हे व्यक्तिविकासाच्या आड येऊ शकते आणि केवळ व्यक्तिविकास समाजाला उपकारक ठरतोच असे नाही.

आजचा विद्यार्थी ज्या प्रकारचे शिक्षण घेतो त्याप्रकारची नोकरी त्याला मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. मग आपल्या शिक्षणाची खरी किंमत

त्याला कळते. तंत्रशिक्षणाची केंद्रे उभारली त्याप्रमाणात औदयोगिक क्षेत्रात वाढ झाली नाही. गुणवत्तेला टक्केवारीचा निकष लावल्याने केवळ जास्त टक्केवारी असलेल्या लोकांनाच सर्वत्र प्राधान्य दिले जाते. अनेक पदवीधर पदव्यांची भेंडोळी घेऊन नोकरीसाठी भिक्षा मागत फिरत आहेत. ' डिगऱ्या नकोत, नोकऱ्या हव्यात ' अशी ओरड करावी लागत आहे. शहराकडील लोकांच्या वाढत्या ओघामुळे ' खेड्यांकडे चला ' असा संदेश देण्याची आणि खेड्यांचे औदयोगिकरण करण्याची पाळी शासनावर आली आहे. थोडक्यात, आजच्या ' बेकार ' शिक्षणाचे ' बेकारी ' हे एकमेव फलित होय. पण ही चूक आज स्वातंत्र्यानंतर अडतीस वर्षांनी तरी शासनाच्या लक्षात येत आहे हे आम्ही आमचे महत्‌भाग्य समजतो. जाऊ दया. 'गेल्याचा शोक वृथा न करणे.'

व्यक्तीची समाजातील प्रगती साधणे व सामुहिक कर्तृत्वाची जाणीव वाढविणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल झाला पाहिजे. ' फूल हसे काट्यात बघ कसे ' या न्यायाने विद्यार्थ्याला जीवनशिक्षण मिळण्याची नितांत आवश्यकता आहे.

शिक्षण हे व्यवसायाभिमुख असले पाहिजे. खेडेगावातून शेती व शेतीवर आधारित व्यवसायांचे शिक्षण देता येईल. तसेच साबण, उदबत्त्या तयार करणे, रेडीओ दुरुस्ती, शिवणकाम, बागकाम यांसारख्या व्यवसायांचे मार्गदर्शन माध्यमिक शाळांतून करता येईल. चित्रकला व संगीत या विषयांकडे विशेष लक्ष पुरवण्याची आज काळाची गरज आहे. आज या विषयांची अवस्था दयनीय आहे. इतिहासाच्या अध्ययनातून नवा इतिहास घडवण्याची क्षमता आली पाहिजे.

शिक्षणात धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव असलाच पाहिजे. कारण धर्म हाच जीवनाचा पाया आहे आणि शिक्षण हे त्याचे एक अंग आहे. समाजाची धारणा करणारा तो धर्म. येथे विशिष्ट धर्मग्रंथात बद्ध झालेला धर्म अभिप्रेत नाही. पाश्चिमात्य देशांतील लोकांनी केलेले संशोधन आपल्या पूर्वजांनी त्या अगोदर केले असल्याचे वर्णन आपल्या संस्कृतीकोषात आहे. ते समजण्यासाठी धार्मिक शिक्षणाची नितांत गरज आहे.

मुलांच्या संस्कारक्षम मनाला पोषक असाच अभ्यासक्रम असावा. प्राथमिक शिक्षक पूर्ण प्रशिक्षित असला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या खिलाडूवृत्तीला वाव मिळण्यासाठी क्रीडांगणे, शोभिवंत बागा, समृद्ध वाचनालय असणे आवश्यक आहे. खेळ, कथा, संगीत, नृत्य, सहल यांचा अंतर्भाव प्राथमिक शिक्षणात अग्रक्रमाने व्हावा.

माध्यमिक शिक्षण मातृभाषेतून असावे. इंग्रजीसारख्या परक्या भाषेच्या गुलामगिरीत विद्यार्थी राहू नये. वेळेचा सदुपयोग करण्यासाठी एक छंदगृहही असावे. विज्ञान प्रात्यक्षिके स्वत: मुलांना करू द्यावीत. काही शाळांतील प्रयोगशाळेत साहित्य उपलब्ध नसते. मग बहुतेक प्रयोग फळ्यावरच यशस्वी होतात, येथे विद्यार्थ्यांची जिज्ञासू व कृतिशील वृत्ती मारली जाते. विविध संस्थांचे कार्य कशा पद्धतीने चालते याची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी. शिस्तीच्या बाबतीत ' छडी वाजे छमछम विद्या येई घमघम् ' हे पूर्वजांचे तत्त्वच अनुसरले पाहिजे. म्हणतात ना, ' old is gold '.

माहिती, ज्ञान, कौशल्य अशी जी विविध साधने मानवाने आत्मसात केलेली असतात, त्यांचे उपयोजन त्याला आपल्या स्वत:च्या, समाजाच्या, देशाच्या आणि जगताच्या कल्याणाकरिता करता आले पाहिजे. नी. र. सहस्त्रबुद्धे यांनी म्हटल्याप्रमाणे, ' कोण, केव्हा, कसे, कोठे व का हे आपले पाच सेवक आहेत. त्यांना हाताशी धरूनच ज्ञान संपादन करता येईल. हे लक्षात ठेवून विद्यार्थ्यांचा चौकसपणा वाढवण्यास प्रयत्न व्हावेत. प्रज्ञावंतांचा शोध घेणाऱ्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षांसारख्या परीक्षांना पालक व शिक्षकांनी प्रोत्साहन दिले पाहिजे.'' यातूनच समाजाचे उन्नयन करणारा एखादा ज्ञानेश्वरांसारखा प्रज्ञावंत निघेल आणि मग तिथे आण्विक युद्धाची भाषा नसेल तर ' हे विश्वचि माझे घर ' हा भाव तेथे असेल. शिक्षणाने सुसंस्कारित झालेली मने शेवटी ज्ञानेश्वराच्या शब्दातच म्हणतील–

दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो
जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणीजात ।।

‡ ‡ ‡

'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !

**श्री. सद्‌गुरू हार्डवेअर स्टोअर्स, देवगड**

संडास भांडी, सिमेंट पाईप ग्रील्स, तसेच लोखंडी पन्हाळी व प्लेन पत्रे, कडापा, रफ फरशी मोझेक टाईल्स व प्लायवूड, सनमायका व काच आणि घरासाठी लागणारे हार्डवेअर मिळण्याचे देवगडमधील ठिकाण

卐

c/o ☎ 65

**प्रोप्रा. पटेल आणि कं.**

'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !

इमारती व फर्निचरसाठी लागणारे कारवारी, किंजळ, नाणा व आईन जातीचे लाकूड योग्य दरात मिळण्याचे तसेच योग्य दरात सुबक चिरकाम वेळेवर मिळण्याचे ठिकाण म्हणजे

# श्री भगवती सॉ मिल

**मु. पो. ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग**

**प्रोप्रा. पटेल आणि कंपनी**

☎ देवगड ६५

# रविकिरण मंडळातील अखेरचा तारा निखळला

कु. निलीमा भिडे
प्रथम वर्ष कला

राजकवि आणि महाराष्ट्रकवि म्हणून गौरविले गेलेले आणि रविकिरण मंडळाच्या कालखंडात तेजाने तळपलेले कवि यशवंत उर्फ यशवंत दिनकर पेंढारकर यांचे २६ नोव्हें. १९८५ ला निधन झाले.

कवि यशवंत यांचा जन्म सातारा जिल्ह्यात चाफळ येथे ९ मार्च १८९९ साली झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण चाफळ येथे व माध्यमिक शिक्षण सातारा येथे झाले. १९२३ साली सात कवींनी एकत्र येऊन सुरू केलेल्या रविकिरण मंडळाचे ते शेवटचे सदस्य होते. यशवंतांचे कवितासंग्रह रविकिरण मंडळातर्फेच प्रकाशित झाले आहेत. यशोधन, यशोगंधा, यशोनिधी, ओजस्विनी, पाणपोई आदि कवितासंग्रह असून बंदीशाळा, जयमंगला, रणदुर्गा, झाशीवाली ही खंडकाव्ये आहेत. ' कमंडलु ' हा त्यांचा अलिकडचा काव्यसंग्रह असून किमान २०० कविता अप्रकाशित आहेत. प्रकृती साथ देत नसतानाही त्यांनी १९६८ साली ' छत्रपती शिवराज ' हे खंडकाव्य लिहून पूर्ण केले. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली बडोदा येथे झालेल्या १० व्या साहित्य संमेलनात यशवंतानी प्रथम आपले काव्यगायन केले. त्यांनी ' देहाचा पूल ' ही कविता म्हटली होती. त्यांच्या कविता ऐकून बडोदा संस्थानच्या राजेसाहेबानी यशवंतांची ' राजकवी ' म्हणून नेमणूक केली. यशवंताच्या साहित्यसेवेची पावती म्हणून १९५० मध्ये मुंबईत भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. महाराष्ट्र शासनाने ' महाराष्ट्र कवी ' हा बहुमान देऊन त्यांचा सन्मान केला होता. १९६८ मध्ये 'पद्मभूषण' हा सन्मानही मिळाला.

कविवर्य यशवंतांची खरी निष्ठा काव्यावरच होती व गुरूचे भाकित आपल्या एकनिष्ठ काव्यसाधनेने त्यांनी खरे करून दाखविले. महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून त्यांचा आवाज घुमला. रसिकांची मने त्यांनी जिंकली, रिझविली. त्यांच्या हृदयात जिव्हाळ्याचे स्थान मिळविले. यशवंतांनी आपल्या प्रदीर्घ साहित्यसेवेच्या कालखंडात काही सकस गद्यलेखनही केले. ' समर्थ रामदास ' एक अभ्यास ' (१९६५) हा टीकाग्रंथ त्यांनी लिहिला व ' हपिसर ' (१९६२) ह्या नावाने आपल्या पूज्य, जिद्दी पिताजींचे हृदयस्पर्शी चरित्र चित्रणही केले पण अवघ्या महाराष्ट्राला यशवंत माहीत आहेत ते ' आई ' सारख्या त्यांच्या कवितेमुळे. त्यांच्या विपुल व सौष्ठवयुक्त भावकवितेमुळे हेच खरे.

' येई भाई येथ पाही ।
घातली ही पाणपोई
धर्म जाती कोणती ती
भेद ऐसा येथ नाही '

ही त्यांची समावेशक अशी साहित्य निर्मितीची भूमिका आहे.

माधव ज्युलियन, गिरीश, घाटे, श्री. बा. रानडे इत्यादि कविमित्रांनी स्थापित केलेल्या 'रविकिरण मंडळा'चे यशवंत हे एक एकरूप सदस्य होते. पदवी, पैसा व प्रतिष्ठा यांचे फारसे पाठबळ नसता 'रविकिरण मंडळा'तील या कवीने धीराने वाटचाल सुरू केली व काव्यक्षेत्रात आपल्या नावाची स्वतंत्र मुद्रा नोंदवून ठेवली. त्या काळी सामाजिक व राजकीय क्षेत्रातही बरीच उलथापालथ चालू होती. त्या स्थित्यंतराचे काही प्रतिबिंब रविकिरण मंडळाच्या सदस्यांच्या काव्यातुनही उमटले. प्रेमविषयक व समाजसुधारणाविषयक कवितेत भर पडली. भावकविता विशेष विशुद्ध स्वरूपात अवतरू लागली. सुनीत, खंडकाव्य अशा प्रकारांची मराठीत

भर पडली. काव्यगायनाची प्रथा जोमाने सुरू झाली. मराठी कविता सर्वसामान्य माणसांपर्यंत रविकिरण मंडळाच्या सदस्यांनी नेऊन पोचविली. या सर्वात कविवर्य यशवंतांचा वाटा मोठा आहे, यात संदेह नाही. रविकिरण मंडळाच्या मर्यादा लक्षात घेऊनही त्यांनी बजावलेली काव्य जागरणाची कामगिरी दुर्लक्षिता येणार नाही.

सन १९२० ते १९३५ हा कालखंड साधारणत: रविकिरण मंडळाच्या प्रभावाचा काळ म्हणून ओळखला जातो. कवि यशवंत तर 'आजकाल पावेतो' आपली काव्यसाधना जणू व्रतस्थ रीतीने करत राहिले होते. व्यक्ती-जीवनातील भावानुभव व्यापक पातळीवरून व्यक्त करण्याची यशवंतांची एक खास शैली होती. काही प्रतिके वा प्रतिमा योजून ते आपला अनुभव हा सर्वांचा आहे हे प्रचितीस आणून देत. विशेषत: मध्यमवर्गियांच्या जीवनातील सुखदु:खाशी समरस होऊन त्यांना वाचा फोडण्यात कवि यशवंतांनी खूप यश संपादन केले. यशवंतांची कविता जशी सौंदर्यवादी व आत्मनिष्ठ होती तशीच ती सामाजिक जाणिवांचा वेध घेणारी होती. वृत्त, जाती, छंद, जुने, नवे यशवंत कुशलतेने हाताळीत. यशस्वी भावगीतकार म्हणून त्यांची ख्याती झाली ती रास्तच म्हटली पाहिजे. 'आई' ही यशवंतांची कविता तर सुप्रसिद्धच आहे. २२ जानेवारी १९२१ रोजी या गाजलेल्या कवितेचे लेखन झाले. यशवंतांचा बडोद्याला जो गौरव झाला तो त्यांची आई पाहू शकली नाही. त्यांनी लिहिले.

' गुंफून पूर्वजांच्या । मी गाईले गुणाला
आई, करावया तू । नाहीस कौतुकाला
स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी '

ही मराठीत सुभाषितरूप झालेली काव्यपंक्ती यशवंतांनीच आपणाला दिली. यशवंतांचे मन संवेदनशील व हळवे होते, कवीला प्रतिभेचे काही ईश्वरदत्त देणे असावे लागते ही गोष्ट तर खरीच. यशवंताना ते देणं निसर्गाने हात न आखडता दिले होते. म्हणून तर आयुष्याच्या अखेरीपर्यंत ते सरस काव्यनिर्मिती करीत राहिले. पण कवितेसाठी त्यांनी खूपच तपश्चर्या केली

कवि यशवंतांनी सामाजिक, सांस्कृतिक स्वरूपाचे विचार आणि भावना आपल्या काव्यातून व्यक्त केल्या. कौटुंबिक जीवनातील नित्याच्या साध्या पण हृदयद्रावक प्रसंगांची परिणामकारक चित्रे त्यांनी आपल्या काव्यांतून रेखाटली आहेत. या कवीचे व्यक्तिमत्त्व प्रतिकूल परिस्थितीशी झगडा देता देताच प्रगल्भ होत गेले. उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली नाही तरी उदंड वाचनाने त्यांनी ती उणीव भरून काढली. बंदीशाळेत सामान्य स्वरूपाची नोकरी त्यांना चरितार्थासाठी करावी लागली पण त्या वातावरणातून ' बंदिशाळा ' या मराठीतील लक्षणीय खंडकाव्याचा जन्म झाला. या काव्यामुळे ' बंदिशाळे' तील गुन्हेगार प्रवृत्तीच्या कोवळ्या वयाच्या बालकांच्या जीवनाचा सहानुभूतीपूर्वक विचार प्रथम समाजापुढे आला. कवि यशवंतानी सामान्यांच्या जीवनातील बरे-वाईट, चढउतार, यशापयश यांचे आलेख रेखाटले. शरीर जीर्ण झाले असताही कवीची लेखणी थांबली नव्हती. १९८४ हे नवे वर्ष लागण्याच्या वेळी त्यांनी त्याचे स्वागत करणारी कविता लिहिली.

' नववर्षाचा हा दिवस उदेला पहिला ।'

नवा दिवस जुन्याचा अधिकारी वारस असतो. नवी पिढी जुन्या पिढीची वारसदार असते. तिने जुन्यांचा सत्यं-शिवं-सुंदरावरील निष्ठेचा वारसा पुढे चालवावयाचा असतो. कविवर्यांच्या जीवनाचे व वाङ्मयाचे परिशीलन करताना 'माणुसकी', 'मानवता' ही मूल्ये प्रथम उभी ठाकतात. ' श्रेयाचे वाटेकरी ' या कवितेत ते म्हणतात-- ' आपल्या जीवनाच्या श्रेयात, जीवन यशात आपली पत्नी, बंधु, भगिनी,मुले, सखेजन, टीकाकार व अज्ञात प्रेम करणारे अनेक जण या साऱ्यांचा वाटा असतो. या सर्वांमुळे आपले जीवन सुफलित होते.

ते बडोद्याचे राजकवि झाले. साहित्यसम्मेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. महाराष्ट्रकवि हा त्यांना सन्मान मिळाला. पद्मभूषण किताब मिळाला. असे सुखी समाधानी आयुष्य ते जगले. विपुल, अमोल साहित्यसेवा मागे ठेवून कवि यशवंत आपल्याला सोडून गेले. आपण आता त्यांच्या आठवणी काढत रहायचे आणि त्यांच्या काव्याचा आस्वाद घेत रहायचे. त्यांच्या निधनाने रविकिरण मंडळातील एक शेवटचा तारा निखळला आणि मराठी साहित्यशारदेतील एक सोनेरी पान गळून पडले.

‡ ‡ ‡

# गंध हिरव्या निसर्गाचा

**विजय खवळे**
तृतीय वर्ष कला

मी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला असताना स्नेहसंमेलनानिमित्त आलेल्या कोण्या प्रतिभावंत साहित्यिकाने आपल्या अंतर्बाह्य मनाचे दर्शन घडवताना आणि विविधतेची जाणीव करून देताना म्हटले होते की, "आजुबाजुच्या निसर्गातून हिरवा रंग टिपायचा असतो व पिऊन घ्यायचा असतो." या त्यांच्या उद्गारांची जेंव्हा जाण होते त्यावेळी स्नेह आणि औत्सुक्य यांची दृष्टी सभोवार फिरवल्यास हा रंग खरोखरच पिऊन घ्यावासा वाटतो. हा विचार वरवर पहाता निसर्गाच्या जवळीकीचा वाटतो पण याचा खोलात जाऊन विचार केला तर मनाचे स्नेहबंध घट्ट बांधून ठेवणाऱ्या विवेकाशी आहे, नव्या दिशांशी आहे, व्यापक विश्वाशी आहे, याची जाणीव होते. हिरवा रंग हा वेदकाळापासूनच समृद्धीचा जल्लोष करणारा असल्याचे अनेक दाखले आहेत. माणसाच्या जीवनात हा रंग आहे म्हणूनच नीतीमूल्यांची जपणूक होते, परंतु याचा विसर आपणास जेव्हा पडेल तेंव्हा जीवन भकास, संकुचित आणि क्रोधी होईल.

स्वर्गातून जेथे जेथे अमृताचा वर्षाव होतो, तेथे तेथे हिरवळीचे ठसे उमटलेले आपणास दिसतात. म्हणजेच जेथे तृप्ती आहे तेथे समृद्धी. भारतीय राष्ट्रध्वजावर समृद्धीचा जल्लोष करीत हा हिरवा रंग मिरवताना दिसतो. हा रंग कोणाला नको आहे? सर्वानाच तो हवाहवासा वाटतो. श्रावणातला हिरवा रंग कोणी पाहिला नाही? सभोवार पहावे तिकडे हिरवेगार. यावेळी साऱ्या सृष्टीतच चैतन्याचा उन्माद भरलेला दिसतो. नवे तृण, नव्या वेली, नवी गाणी, नवे शृंगार, नवी स्वप्ने, नव्या इच्छा, सारेच नवे! याच दिवसांत जनमानसात नवा हर्ष आणि उत्साह सणासुदीमुळे भरलेला असतो. निसर्गाने मुक्त हस्ताने केलेली ह्या रंगसंगतीची उधळण पाहण्यासाठी संध्यासमयी घराबाहेर पडा, दूर चला.

हिरवी वळणे घेत-घेत पायवाटेने पुढे कुरणाच्या दिशेने चला. सायंकाळचा मंद शीतल समीर अंगाला लागू दया, आता जरा भुईसपाट पसरलेल्या आणि हिरव्या तृणांनी अंथरलेल्या वनदेवीच्या गालिच्यावर पहुडा; पहा हे तृण किती लुसलुशीत आहेत. सुखद स्पर्श डोक्यावर पाहिलात काय ? अनंत आकाशात नाना कलाकृतींच्या कृष्ण मेघांची क्रीडा चालली आहे. या लपंडावात अस्ताकडे चाललेला दिनकर कुठे दडला आहे ? हा पहा आला आणि त्याने आपल्या शीतल सोनेरी किरणांची तिरीप अवनीवर सोडलीय. लांबून सळसळत येणारी सर या तिरीपीत जेव्हा येते त्यावेळी पहा! अवनीवर होणारी हिऱ्या-मोत्यांची उधळणच जणूं! परंतु ती क्षणिकच. पुन्हा लपाछपी चालू होते. मोठया थेंबांचा सळसळा सळसळत निघून जातो. आता तृणपर्णांवर, वेलींवर, फुलात दबा धरुन बसलेले जलबिंदू पहा कसे मोत्यासारखे चमचमतात, लखलखतात. त्यांना वाऱ्याची जरा झुळुक लागू दया. मग पहा, जमिनीत ते कसे आसुसल्यासारखे विलीन होतील.

एकेक नवलाईच न्यारी. अशा तृणपर्णांच्या गालीच्यांतून डोकावणारी पांढरी, पिवळी, निळी, जांभळी, नारिंगी, गंधीत फुले पहा. समोर शेताभाताच्या कडेला हरणे आणि तेरडे यांचे ताटवे वाऱ्याच्या झुळकीने कसे डोलताना दिसताहेत.जणूं काही हेलकावणाऱ्या पिवळया–तांबडया झालरीच हे काय आश्चर्य ! काळया खडकावरल्या डबक्यातील तृणांना

तांबडा, पिवळा रंग कोणी दिला ? आणि हिरवा रंग कोठे गेला ? त्याच्या माथ्यावरची इवलीशी फुले पाहून सृष्टीच्या गूढतेचा अचंबा वाटतो.

आता समोर नजर टाका. वैशाखातले उघडे रखरखीत दिसणारे डोंगर आता पार कसे शेताभातांनी हिरवे झाले आहेत. वळणावळणाची ही तांबडी पायवाट त्यावर उठून दिसते आहे भाग्यरेषेसारखी. या हिरव्या शालीवर हे रंगीत ठिपके कसले पांढरे, काळे आणि तांबडे. अरे हो ! ही तर शाळकरी मुले गुराढोरांच्या मागून रेंगाळत आहेत. थोडा विस्मय वाटतो. डोंगराच्या पायथ्याशी पहा, उग्र रूप धारण केलेला समुद्र काळचा–कभिन्न कातळावर आपल्या प्रत्येक लाटेने आलिंगन देत आहे, चुंबन घेत आहे. ओघळणारे प्रपात आणि लाटांचे उंच उडणारे तुषार पहा कसे वातावरणात विलीन होत आहेत. चित्रकाराचे, प्रतिभावंत कवीचे मन इथे उचंबळून यावे. पण कोण गुंफणार शब्द आणि कोणाला देता येणार रंगरंगोटी ! येथे सगळेच अपुरे, मात्र डोळयात तृप्त होईपर्यंत साठवून घ्यावेसे वाटणारे !

आपले हातपाय जमिनीवर अंथरून विस्तारलेल्या करवंदीच्या जाळीवर ही कोण बरे खगमंडळी किलबिलाट करीत आहेत ? बुलबुल बागडताहेत तर पोपट,हरेल समोर वेलींवर असूनही कसे आपले अस्तित्व न दाखवता लपाछपी करताहेत.

आता मात्र कोठेतरी चातकाच्या हाका ऐकू येतात. पावसासाठी टाहो फोडणाऱ्या, थेंबांना आसुसलेल्या दूतांच्या हाकेतून मग जाग येते. अवतीभवती पाहू लागतो तो दिशा काळवंडू लागतात. मग मात्र पाय उचलावे लागतात, त्या मऊ हिरवळी वरून दगडी चार भिंतींच्या आतील चातकासारखी वाट पहाणाऱ्या मनांच्या हिरव्या प्रेमासाठी.

‡ ‡ ‡


'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

रस्त्यांची, इमारतींची, पुलांची व इतर कामे
करून देणारी देवगड तालुक्यातील
एकमेव संस्था

**देवगड तालुका सहकारी**
**मजूर संस्था मर्यादित**

चेअरमन – **व्हो. ए. कोरगांवकर**

सेक्रेटरी – **बाबू आईर** (शिरगांव)

'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

**हेमंत श्रीकृष्ण पारकर**
**अँड ब्रदर्स**

**जनरल मर्चंट अँड कमिशन एजंट**

फोन नं. – ५०

# मालवणचा सिंधुदुर्ग किल्ला

**कु. संध्या भिडे**
तृतीय वर्ष कला

भू, जल व गिरी अशा तिन्ही प्रकारच्या किल्ल्यांना फार पूर्वीपासूनच महत्व आले होते. मुसलमानांनी तोफांचा वापर सुरू केला असला तरी त्यांचे ज्ञान आणि त्यांची कला प्राथमिक स्वरूपाची असल्याने किल्ल्यांचे महत्त्व या काळातही टिकून होते. हे राज्य शिवाजी महाराजानी निर्माण केले. परकीय अंमलाखालचे अनेक किल्ले त्यांनी हिसकावून घेतले व त्यांची डागडुजी केली. तर काही किल्ले नवीन बांधले. मोगलानी जेव्हा समुद्र किनाऱ्यावरील जनतेस लुटण्यास सुरुवात केली त्यावेळी शिवाजी महाराजानी पश्चिम किनारपट्टीवरील लोकांचे संरक्षण करण्याचे प्रयत्न सुरू केले.ह्या हेतूनेच त्यांनी जलदुर्ग किल्ले बांधण्यास सुरुवात केली. सिंधुदुर्ग जिह्यात विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग व सिंधुदुर्ग हे किल्ले महत्त्वाचे आहेत. आरमाराचे खरे महत्त्व शिवाजी महाराजानीच जाणले होते.स्वराज्याचे रक्षण करावयाचे असेल तर पश्चिम किनारा ताब्यात हवा याची जाण त्यांना होती. त्यासाठी आरमार उभारून किनाऱ्यावरील किल्ले ताब्यात घेणे व बांधणे यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. याच प्रयत्नांतून त्यांनी मालवणजवळ सिंधुदुर्ग किल्याची उभारणी केली.

## महाराज कोकणात

१६६४ च्या उन्हाळ्यात महाराज दक्षिण कोकणात सैन्यासह उतरले. आणि म्लान चेहऱ्याने वावरणारी कोकणी माणसे काहीशी निर्भय झाली. महाराजानी कुडाळ प्रांत हस्तगत करून स्वकीय शत्रूंना चांगला धडा शिकविला. महाराजानी या वेळेपर्यंत उत्तरेला गड, किल्ले बांधून स्वराज्याच्या शत्रूंचा योग्य तो बंदोबस्त केलाच होता. परंतु या साऱ्या धावपळीत आणि सतत पाठीवर शत्रु असल्यामुळे महाराजाना दक्षिणेकडे लक्ष देण्यास पुरेसा अवसर मिळाला नव्हता. परंतु उन्मत्त घोरपड्यांचा बंदोबस्त करण्याच्या निमित्ताने महाराजांनी मुधोळवर स्वारीकेली. स्वराज्याचा स्वकीय शत्रू बाजी घोरपड्याचा नायनाट केला. महाराज कोकण प्रांतात जात असल्याची खबर आदिलशहाच्या दरबारात पोचली होतीच. त्यामुळे महाराजाना अपशकुन करून त्यांचे पारिपत्य करण्यासाठी आदिलशाहीतील एक सरदार खवासखान त्यांना आडवा आला. त्याला महाराजानी पिटाळून लावले आणि ते सरळ कोकणात आले. कुडाळ सावंतवाडीच्या सावंत भोसल्यानी स्वराज्याच्या कामी महाराजाना त्रास देण्याचा चंग बांधला होता.

आता त्यांच्यापुढे पश्चिम किनाऱ्याचे संरक्षण करण्याचे अवघड काम होते. त्यासाठी सागरी आरमार निर्माण करुन जंजिऱ्याच्या सिद्दीला, गोव्याच्या फिरंग्यांना व मुंबईच्या टोपीकरांना दहशत बसवून त्यांची चाचेगिरी मोडून काढणे अगत्याचे होते. त्याशिवाय तेथील जनता सुखी होणार नाही, शिवाय ज्या राज्यात सागरी सीमा सुरक्षित नाही ते स्वराज्य संरक्षित नाही याची जाण महाराजाना होती.

## कुरटे बेटाची पाहणी

सुवर्णदुर्ग, दाभोळ, अंजनवेल, विजयदुर्ग, पालगड आणि मोक्याचे समुद्रगड महाराजांच्या कब्जात होते. परंतु आरमार सुसज्ज करण्यात अपुरेपणा होता तो पुरा करण्याच्या उद्देशाने त्यांनी सागरी पाहणी केली आणि मालवणच्या समुद्रात त्यांना जागा पसंत पडली.

कुरटे बटाचे भाग्य उदयाला आले. श्रीरामाला अहिल्येची शिळा दिसली. महाराजानी स्वतः त्या बेटावर जाऊन पाहणी केली. चारही बाजूंनी समुद्राने वेढलेल्या त्या बेटावर गोड्या पाण्याचे झरे पाहून महाराज आनंदित झाले. त्यांना तो शुभशकुन वाटला.

## सिंधुदुर्ग किल्ल्याची उभारणी

महाराजानी कुरटे बेटावर किल्ला बसविण्याचा निर्णय घेतला आणि नृपशालिवाहन शके १५८६ मार्गशीर्ष वद्य द्वितीया म्हणजेच २६ नोव्हेंबर १६६४ या दिवशी स्वतःच्या हाताने मुहुर्ताचा चिरा बसविला. या दिवशी गणपती, सूर्य, चंद्र इत्यादी देवतांचे पूजन करून किल्याच्या बांधकामास सुरूवात केली. ज्याठिकाणी हा पूजाविधी झाला त्या ठिकाणी अद्यापही एका कातळावर चंद्र, सूर्य, गणपती व शंकराची पिंडी अशा देवतांच्या मूर्ती पहावयास मिळतात. ज्या शिळेवर या मूर्ती कोरल्या आहेत ती शिळा 'मोरयाचा दगड' या नावानेओळखली जाते. या किल्ल्याच्या उभारणीसाठी वाटाखट, दोनशे लोहार, पंधराशे मजूर, दोनशे खंडी लोखंड व मणांनी शिसे लागल्याचा पुरावा इतिहासात नमूद आहे. या किल्ल्याच्या संरक्षणासाठी पद्मगड, राजकोट, सर्जेकोट, भगवानगड आदि बांधून सागरी आरमाराची मोठ्या प्रमाणात वाढ केली. त्यामुळे मालवण शहर व आजूबाजूचा प्रदेश सागरी आरमाराचे महत्त्वाचे केंद्र बनले आणि त्यामुळे राजकारणाच्या दृष्टीने सिंधुदुर्गास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले.

## महाराजाना झालेला दृष्टांत

सिंधुदुर्ग किल्ल्याच्या निर्मितीविषयी अशी आख्यायिका सांगतात की, जेव्हा किल्ला बांधण्यास प्रथम सुरूवात केली तेव्हा लावलेला दगड कोसळून पडू लागला. शिवाजी महाराजाना स्वप्नात दृष्टांत झाला. स्वप्नात शिवलिंग दिसले. ते महाराजाना म्हणाले, " तू आहेस त्या ठिकाणापासून उत्तरेस सात कोसावर मी एका राईत निराधार पडून आहे. तू माझी व्यवस्था कर. तुझे हाती घेतलेले काम पूर्ण होईल. मी तुझ्या पाठीशी आहे. " दुसऱ्याच दिवशी महाराजानी ही गोष्ट तेथील लोकांना सांगितली व त्यांना बरोबर घेऊन ते त्या राईत आले. खरोखरच एका झुडुपात ते शिवलिंग पडून होते. ते लिंग श्री रामेश्वर असल्याचे त्यांना कळले. त्यानंतर गावकऱ्यांच्या संमतीने शिवाजी महाराजानी शिवलिंग श्री रामेश्वरची घुमटी बांधली. आजही देवळात जी मूर्ती दिसते, ती शिवछत्रपतीनी बांधलेली आहे. त्यानंतर महाराजानी किल्ल्याचे बांधकाम हाती घेतले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे किल्ला पटापट बांधून झाला. त्यानंतर महाराज त्या शिवलिंगासमोर येऊन नतमस्तक झाले.

## किल्ल्यावरील महाराजाचे एकमेव मंदीर

असा हा पराक्रमी सिंधुदुर्ग महाराष्ट्राचा अभिमान ठरला. भारताचे गौरवस्थान झाला आणि महाराजांच्या पदस्पर्शाने ही सिंधुनगरी पावन झाली. छत्रपतीनी बांधलेल्या या किल्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात असलेले शिवरायाचे मंदीर, १८६९–७० सालात राजाराम महाराजानी बांधले. या मंदीरातील शिवाजी महाराजांची दगडी कोरीव मूर्ती कोळयाच्या वेशातील आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रातील कुठल्याही किल्ल्यात शिवाजी महाराजाचे मंदीर नाही हे विशेष आहे.

## सिंधुदुर्ग किल्ल्याची रचना

किल्ल्याच्या बांधणीचे काम जवळ जवळ ३ वर्षे चालू होते. १९ हेक्टर क्षेत्राखाली २ मैल एवढा तट बांधला. या तटाची रूंदी प्रत्येक ठिकाणी २ बैलगाड्या जाऊ शकतील एवढी होती तर उंची कमीजास्त ३० फूट इतकी होती. तट सर्पाकृती असून एकूण ५२ बुरूज आहेत. किल्ल्याचे महाद्वार पूर्वेस असून ते वळणावळणाचे आहे. किल्ल्यात राजाराम महाराजानी बांधलेले श्री. शिवराजेश्वराचे मंदीर तसेच भवानी, जरीमरी, महादेव अशी देवळे आहेत.
महाराजांचा वाडा व त्यांच्या शेजारी साखरबाव, दूधबाव, दहिबाव इत्यादी विहिरी, ध्वजस्तंभ, किल्यातील कामगारांचे वाडे इत्यादीचे बांधकाम त्यांनी केले. दक्षिणेकडील निवतीच्या खडकावर एक प्रचंड दीपस्तंभ आहे. पश्चिमतटावरही एक दिवा असून तो गलबतांतील खलाशांना धोक्याचा इशारा देत असतो. चहूबाजूला पाणी आहे. पण पश्चिमेकडील सिंधुदर्शन रोमांचक आहे. खरोखरच सिंधुदुर्ग ही श्रीलंकाच आहे.

## मालवणची मरीन पार्क योजना

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण शहर एक निसर्गरम्य शहर आहे. मालवणचा सिंधुदुर्ग पर्यटन केंद्र बनण्यास फार मोठा वाव आहे. आजही त्याठिकाणी शाळा कॉलेजचे विद्यार्थी तसेच हौशी प्रवासी सहली घेऊन येतात आणि सिंधुदुर्गावरचा आनंद हृदयात साठवून परत जातात. या शहरात अनेक ऐतिहासिक महत्त्व असलेली मंदीरे आहेत. याठिकाणी जर पंचतारांकित उपहारगृहे बांधण्यात आली तर पर्यटकांची फार मोठी सोय होईल. त्याचप्रमाणे फेरीबोट, लॉंचीस इत्यादींची वाहतूक सुरू केल्यास पर्यटकांची सोय होईल. जास्तीत जास्त लोक या ठिकाणी आकर्षिले जातील. या दृष्टीकोनातून सरकारनेही काही योजना आखल्या आहेत. मालवण येथे लवकरच 'मरीन पार्क' होणार आहे. मरीन पार्कमुळे मालवणचे नाव जगाच्या नकाशावर येणार असून भारतसरकारचा तो एक चांगला प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे पर्यटकांना ही एक पर्वणीच लाभणार आहे.येथील सिंधुदुर्ग किल्ल्याच्याच परिसरात या मत्स्यसंग्रहालयाची उभारणी होणार असून त्याठिकाणी विविध प्रकारचे मासे ठेवण्यात येणार आहेत. 'मरीनपार्क' योजनेत या ठिकाणी पर्यटन केंद्र उभारण्याचीही योजना आहे. पश्चिम व दक्षिण बाजुला असलेल्या खडकांच्या कपारीत विविध २७० प्रकारचे मासे सापडतात. त्याच्यासाठी एक मत्स्यसंग्रहालय उभारण्यात येणार आहे. ही योजना फलदायी आहे. या योजनेमुळे मालवणचा विकास होण्यास अनायासे मदत होईल. मरीन पार्क झाले तर सिंधुदुर्ग किल्ला व मालवण यांचा विकास होईल. त्यासाठी मालवण शहर व किल्ल्यात बागबगीचा होणेही आवश्यक आहे.

आज तेथे केवळ वीज पुरवठाशिवाय महाराष्ट्र शासनाने काहीही सुविधा केलेल्या नाहीत. मध्यंतरी काही वृत्तपत्रांतून मालवण ते सिंधुदुर्ग किल्ल्यापर्यंत ' फूट वे ' करण्याची शासनाची योजना असल्याचे प्रसिद्ध झाले आहे. पाण्यातून लॉंचीस वा होड्यांमधून जाताना जो आनंद मिळतो तो चालत जाऊन मिळत नाही. म्हणून शासनाने ' फूट वे ' ऐवजी आकर्षक स्वयंचलित होड्या प्रवाशांसाठी सोडाव्यात. त्यामुळे प्रवाशांची सोय तर होईलच, पण नौका विहारासाठी वावही मिळेल. ' हॉवर क्राफ्ट ' बोटीही लवकर चालू कराव्यात. त्याचप्रमाणे किल्ल्यावर नळाचे पाणी, विश्रामधाम, उपहारगृहे इ० सोयी झाल्यास सिंधुदुर्ग किल्ला हे पर्यटन केंद्र बनून येथे देश–विदेशातील पर्यटकांची गर्दी झाल्याशिवाय राहणार नाही.

## ऐतिहासिक साधनांची उपेक्षा थांबवा :–

कोकणचा सुसंगत इतिहास लिहिण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत आणि उत्खलन करून इतिहासाची साधने काढण्याचेही प्रयत्न दिसत नाहीत. अशा स्थितीत कोकणच्या ऐतिहासिक साधनांची उपेक्षा सुरू आहे. अशा कोकणातील दाभोळ, जंजीरा, मुरुड, सिंधुदुर्ग, रेवदांडा, विजयदुर्ग व देवगड किल्ल्यांचे जतन केले जात नाही. असंख्य शिलालेख धूळ खात पडले आहेत. ताम्रपटाची कोणालाच किंमत नाही. आपण प्राचीन ठेवा गमावत आहोत याचे काही भान आपल्याला राहिलेले नाही. ऐतिहासिक साधनांची उपेक्षा थांबविण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्नशील राहिले पाहिजे.

‡ ‡ ‡

' रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

**द्वारका फूडस्‌ची स्वादिष्ट आणि रुचकर उत्पादने**

हापूस आमरस, हापूस आंब्याचा जॅम, हापूस आंब्याचे सरबत, कोकम सरबत, आंबा लोणचे, लिंबू लोणचे, मिश्र लोणचे, आंबा टॉफी आणि बरेच काही

**पोस्ट जामसंडे, तालुका देवगड, जिल्हा–सिंधुदुर्ग**

( दक्षिण रत्नागिरी ) ४१६ ६१२

'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

।। दिर्बा देवी प्रसन्न ।।

देवगड मधील एकमेव चित्रगृह

**विजयालक्ष्मी टुरिंग टॉकिज**

मनपसंत नवीन मराठी व हिंदी चित्रपटांसाठी

प्रोप्रा. – एस. व्ही. खडपकर, देवगड.

'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

**अजित बुक स्टॉल**

एस्. टी स्टँड, देवगड

आमचेकडे शालोपयोगी पुस्तके, वह्या, गोष्टीरूपी पुस्तके तसेच साप्ताहिके मिळतील.

प्रोप्रा. – अजित खडपकर, देवगड.

# मराठी रंगभूमीवरील झंझावात : डॉ. काशिनाथ घाणेकर

**कु. संगीता नेने**
अकरावी कला

काही लोकांचं अस्तित्व आपण गृहीत धरून चालत असतो. त्यांच्या शिवाय जगाची कल्पना आपण करू शकत नाही. पण बऱ्याचदा आपल्याला या दुर्दैवी सत्यास सामोरे जावे लागते. एक मार्चच्या रात्री डॉ. काशिनाथ घाणेकर यांचे निधन झाले व त्यांच्या असंख्य चाहत्यांना धक्का बसला.

डॉ. काशिनाथ घाणेकरांचे व्यक्तिमत्व बहुरंगी होते. अत्यंत हट्टी, फटकळ, हेकेखोर, आग्रही तितकाच भाबडा, लाघवी व अतिप्रेम करणारा अशी बरीच गुणवैशिष्टे त्यांच्या ठायी एकवटली होती. त्यांनी महाराष्ट्रातील नाटचप्रेमींना जो निखळ कलानंद दिला आहे त्याचे विस्मरण कदापिही होणे शक्य नाही.

तीस–बत्तीस वर्षापूर्वी मुंबईच्या भारतीय विद्याभवनच्या वतीने आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा आरंभीत झाल्या व हौशी स्तरावर डॉ. घाणेकरांचा नाटचप्रवास सुरू झाला. त्यानंतर विजय तेंडुलकरांच्या ' माणूस नावचं बेट ', गो. नि. दांडेकर लिखित 'शितू', रत्नाकर मतकरी लिखित 'मधुमंजिरी' हे बालनाटच व आय्. एन्. टी. ने सादर केलेले 'माते तुला काय हवंय' यासारख्या नाटकात डॉ. घाणेकरानी विविध भूमिका केल्या. पण हा त्यांच्या कारकीर्दीचा पूर्वार्ध होता. १९६३ मध्ये मराठी रंगभूमीत इतिहास घडविणारे वसंत कानेटकरांचे ' रायगडाला जेव्हा जाग येते ' या ऐतिहासिक नाटकातील संभाजीच्या भूमिकेतून डॉ. काशिनाथ घाणेकर यांच्या जीवनातील नवपर्व सुरू झाले. त्यानंतर गारंबीचा बापू, अश्रूंची झाली फुले, गुंतता हृदय हे, अंधार माझा सोबती, मला काही सांगायचंय, सुरुंग, आनंदी गोपाळ, इथे ओशाळला मृत्यू, वर्षाव इ. विविध नाटकांतून डॉक्टरांच्या कसदार अभिनयाचे दर्शन महाराष्ट्रातील रसिकांस पहावयास मिळाले.

रंगभूमीप्रमाणेच डॉक्टरानी चित्रपटांतून देखील भूमिका केल्या. पाठलाग, मधुचंद्र, सुखाची सावली, मराठा तितुका मेळवावा, हा खेळ सावल्यांचा, एकटी, चंद्र होता साक्षीला आणि हिंदी चित्रपट दादी माँ हे त्यांचे चित्रपट होत. पण महाराष्ट्राच्या स्मरणात डॉ. घाणेकरांचं नाव रंगभूमी बाबतच अधिक लक्षात राहील.

'एक समर्थ अभिनेता' एवढेच शब्द डॉक्टरांचे वर्णन करण्यास अपूरे आहेत. त्याबरोबरच इतरांवर अफाट प्रेम करणारा, सर्वसामान्यांना आपलासा वाटणारा, अनेकांना विविध प्रकारे मदत करणारा अशा विविध गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्व संपन्न झाले होते.

डॉ. काशिनाथ घाणेकर या एका नावामुळे प्रत्येक नाटचप्रयोग 'हाऊसफुल' जात असे. त्यांना आपल्या प्रत्येक प्रयोगाला 'हाऊसफुल्ल'चा बोर्ड पहाण्याची सवयच झाली होती. परंतु त्यांचा हा वेगवान प्रवास आता संपलेला आहे. यानंतर अनेक नवी नाटकं येतील. त्यांनी केलेली भूमिकाही कोणीतरी करील पण त्यावेळी काशिनाथ घाणेकर नावाचं लोभसवाणं व्यक्तिमत्व असणार नाही. कारण त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाने नाटचसृष्टीत एक वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या अकाली निधनाने मराठी नाटचसृष्टी मात्र एका महान अभिनेत्याला मुकली आहे.ही निर्माण झालेली पोकळी आता कोण भरून काढतंय याकडेच नाटचवेड्या मराठी रसिकांची नजर लागून राहिली आहे.

‡ ‡ ‡

'रसराजला' हार्दिक शुभेच्छा !

" बिना सहकार, नही उद्धार "

# देवगड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड

## देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग

## रौप्यमहोत्सवी वर्ष १९८४।८५

**सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिह्यातील सर्वाधिक खते विकणारी एकमेव संस्था**

**अधिकृत वितरक** – कृषिउद्योग विकास महामंडळ मुंबई
रॅलिज इंडिया लि. मुंबई
आर. सी. एफ्. मुंबई.

याशिवाय शासन नियंत्रित माल

**फिसेल सिमेंट, लोखंडी अवजारे, दारूसामान, पन्हाळीपत्रे**
इ० मालाचा पुरवठा करणारी एकमेव संस्था.

**रा. रा. खानविलकर**
मॅनेजर

**ज. मो. गोगटे**
चेअरमन

# जागतिक कीर्तीचे महान तत्त्वचिंतक - जे. कृष्णमूर्ती

**सतीश धुरत**
तृतीय वर्ष कला

भारतीय समाजात अशी काही थोर व्यक्तिमत्वे स्वतःच्या ध्येयाने, प्रतिभेने आणि निष्ठेने मोठी होतात, की जी आपल्या देशाबरोबर जगातही लाडकी आणि लोकप्रिय होतात. अशाच या भारतवर्षात फार मोठी ध्येयवान माणसे होऊन गेली की ज्यांचे एक वेगळेच विश्व होते, एक वेगळी प्रेरणा होती, वेगळी तत्त्वे होती. सम्राट अशोकाच्या या भूमीत शेक्सपिअरच्या तोडीचे शाकुंतल लिहिणारे कालीदास, गीतांजलीचे रवींद्रनाथ टागोर, विश्वबंधुत्त्वाची शिकागोत पताका फडकविणारे स्वामी विवेकानंद आणि अहिंसेचे शस्त्र देणारे महात्मा गांधी अशी कितीतरी नावे सांगता येतील की जी भारतातच नव्हे तर साऱ्या जगात मान्यता पावली. असेच लोभस, प्रतिभावंत व्यक्तिमत्त्व जे. कृष्णमूर्ती हे एक होऊन गेले. वेद आर्य भूमीत जन्मलेले हे तत्त्वचिंतक वेगळे आविष्कारी जीवन जगले आणि त्यांनी भारतीय परंपरेचे बीज जोपासले.

आंध्र प्रदेशात तेलगू कुटुंबात जन्मलेले कृष्णमूर्ती बालवयातच निसर्गभक्त होते. आजुबाजूच्या निसर्गाशी एकरूप होऊन ते निसर्गाची भाषा शिकले. निळे आकाश, त्यावर निर्माण होत असणारी रंगावली, सूर्योदय व सूर्यास्त, विस्तीर्ण पसरलेली हिरवी शेते, उंच पर्वत शिखरे, फेसाळणाऱ्या लाटा, ताडामाडाच्या वाऱ्याबरोबर डोलणाऱ्या आकृत्या या सर्वांची त्यांना भुरळ पडत असे. त्यात ते रमत आणि निसर्गाची भाषा शिकून त्यांच्याशी गुजगोष्टी करीत. शालेय अभ्यासापेक्षा निसर्ग अभ्यास हाच त्यांना अधिक प्रिय होता.

कृष्णमूर्तीचे वडील नारायण अय्यर थिऑसॉफिकल सोसायटीचे सभासद होते. अड्यार येथे असणाऱ्या या सोसायटीच्या उद्दिष्टात निसर्गातील गूढाचा व मानवाच्या सुप्त इच्छाशक्तीचा शोध घेण हा एक उद्देश होता. थिऑसॉफिकल सोसायटीच्या प्रमुख श्रीमती ॲनी बेझंट होत्या. दरम्यानच्या काळात कृष्णमूर्ती आणि त्यांचे बंधू नित्या यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा आणि विचारांचा ठसा बेझंट बाईवर उमटला. पुढे ॲनी बेझंटनी या दोन मुलांचे व्यक्तिमत्त्व फुलविण्यासाठी त्यांना लंडन, पॅरिस येथे विद्वानांकडून विशेष अध्यात्माचे धडे दिले. जे. कृष्णमूर्ती अध्यात्मातील विचारवंत जगात लौकिक मिळवतील हे याचवेळी सिद्ध झाले. आई लहानपणीच गेलेली. शिक्षण काळात वडिलांच्या सहवासात पोरके झालेल्या कृष्णमूर्तींना शिक्षणकाळात त्यांचा भाऊ नित्या याचा सुखसहवास लाभला होता. पण क्षयरोगाने पछाडून नित्याचा नियतीने घात केला. या आकस्मिक निधनाने कृष्णमूर्तींना खूपच मोठा धक्का बसला. याच दुःखातून त्यांना नवीन दृष्टी लाभली. थिऑसॉफिकल सोसासायटीच्या वातावरणापासून ते दूर जाण्यासाठी प्रयत्न करू लागले. हे एक नवीन विश्व साकारले जात असले तरी ॲनी बेझंटसारख्या गुरूतुल्य थोर व्यक्तिमत्त्वास आपण दूर सारीत आहोत याचीही त्यांना जाण होती. पुढे मात्र संप्रदाय व धर्मपंथ यांचे विरूद्ध त्यांनी आवाज उठवून त्यावर प्रवचने देण्यास सुरूवात केली. त्यांची प्रवचने पाश्चात्य देशात गाजू लागली. संप्रदाय, धर्मपंथ व अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, अध्यात्मिक क्लिष्टता या विचारांनी भारावलेली मने स्वच्छ करण्याची जबाबदारी आपली मानून त्यावर प्रकाश टाकण्याचे कार्य कृष्णमूर्तीनी हाती घेतले. त्यात त्यांना धर्ममार्तंडांचा व धर्मबांधवांचा रोष पत्करावा लागला. भारतात त्यांनी ' गीता ' ' बायबल '

कुराण ' यावरील सनसनाटी विचार मांडले. त्यांच्या या विचारामुळे भारतीयांची मने दुखावली गेली तरी पण त्यांना त्याची पर्वा नव्हती. त्यांचा प्रत्येक विचार स्वतंत्र प्रतिभेचा होता. आपल्या तर्कबुद्धीस पटणारीच गोष्ट ते आपल्या प्रवचनातून लोकांना ठामपणे सांगत असत. " तुम्ही जेव्हा काहीच नसता तेव्हा सारे काही असता. " असा त्यांनी सर्वसामान्य विचार मांडला. भारतात अगर परदेशात त्यांच्या व्याख्यानाला वैचारिक श्रोत्यांची गर्दी होत असे. भारतामध्ये ते प्रतिवर्षी येत असत आणि त्यांना भारतभूमीबद्दल व भारतीय म्हणवून घेण्यात अभिमान वाटत असे. ' साधी राहणी, उच्च विचारसरणी ' 'देश तसा वेष' हे तत्त्व त्यांनी जीवनात अंगीकारले होते. म्हणून ते अमेरिकेत असताना सुटाबुटात वावरत. मात्र हिंदुस्थानात त्यांचा पाय लागताच कृष्णमूर्तींना कोणतेही काम करण्यास कमीपणा वाटत नसे. जीवनातील श्रम, प्रतिष्ठा महत्त्वाची असल्याचा त्यांचा दावा होता. बागेस पाणी घालणे, भांडी स्वच्छ करणे किंवा बूटपॉलीश करणे ही स्वतःची कामे ते स्वतःच करीत असत.

प्रसन्न, लोभस व्यक्तिमत्त्व, ऊंच शरीरयष्टी, तीक्ष्ण चमकदार नजर, धारदार नाक, रुंद कपाळपट्टी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. वृद्धापकाळातही हे उमदेपण शरीराप्रमाणे मनानेही टिकवून ठेवले होते. कृष्णमूर्ती स्वतंत्र प्रतिभेचे साहित्यिक होते. त्यांनी जगभर प्रवास केला. भारतात ते प्रतिवर्षाप्रमाणे आले असता त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने ते पुन्हा अमेरिकेला गेले. पण, दुर्दैवाने वयाच्या ९० व्या वर्षी अमेरिकेतील कॅलिफोर्नियात 'पाईन कॉटेज' या त्यांच्या निवासस्थानी १७ फेब्रुवारी १९८६ रोजी त्यांच्यावर काळाने झडप घातली व जग एका थोर तत्त्वचिंतकाला मुकले.

जे. कृष्णमूर्तींनी सर्व संप्रदायांना न डगमगता जबरदस्त हादरा दिला. " ना कोणाचा कोण गुरू, ना कोण शिष्य, ज्याला त्याला आत्मपरीक्षणाने स्वतःचा मार्ग चोखाळायचा आहे " अशा प्रकारचे तळमळीचे आणि नवस्फोटक विचार, त्यांनी पन्नास वर्षे जगातील अनेक देशात विशेषतः लोकशाही राष्ट्रात बिंबवण्याचा प्रयत्न केला. स्वतःस गुरू न मानता आमच्याबरोबर वाटचाल करणारा स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा हा सहप्रवासी आम्हाला कायमचा अंतरला आहे. जे. कृष्णमूर्ती सारख्या थोर भारतीय विचारवंतास, तत्त्वचिंतकास जग कायमचे मुकले आहे.

‡ ‡ ‡



'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

KING
LOVELY
POP CORN
SUPER IN
TASTE
AND
QUALITY



**ताजे, खमंग पॉप-कॉर्न**
**आणि वेफर्स**
मिळण्याचे एकमेव ठिकाण
**रामानंद पॉप-कॉर्न सेंटर**
**पंचायत समिती नजीक, देवगड.**

'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !



**बापू काशिनाथ केळकर**
**मु. पो. दाभोळे. ता. देवगड**
**☎ देवगड-४४**

# बाबा आमटे : एक महान कर्मयोगी

**कु. विनिता पोकळे**

अकरावी वाणिज्य

" माझ्या महारोगी रुग्णांच्या चेहऱ्यांवर झळकणारे हास्य हेच माझे पारितोषिक आहे, त्याची किंमत इतर कोणत्याही पारितोषिकांपेक्षा नक्कीच महान आहे, असे मला वाटते. " असे उद्‌गार ज्यावेळी एका ध्येयवादी, प्रतिभावंत, त्यागीवृत्तीच्या तपस्वीच्या अमृतवाणीतून प्रकटतात तेव्हा वाटते, खरोखर जगातील महान पारितोषिक त्यांच्या कार्याचा यथार्थ गौरव करू शकेल का ? दैवाने व माणसाने लाथाडलेल्या गटारगंगेत शरीरावर किडयांनी माखून पडलेल्या, दु:खी–कष्टी व जिवंतपणी मरणकळा सोसणाऱ्या महारोग्यांच्या जीवनात दु:खाश्रूंच्या ठिकाणी आनंदाश्रू आणण्याचे उदात्त कार्य बाबा करीत आहेत. खऱ्या अर्थाने ते एक महान आधुनिक तपस्वी आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये. वकिलीची सनद गुंडाळून व मऊ मखमलीच्या गादीवर लोळत ऐषआरामात जीवन जगण्याचा मार्ग सोडून त्यांनी हातापायांतून रक्त स्त्रावणाऱ्या काटयाचा मार्गच पसंत केला व जीवनभर समाजसेवेचे पोलादी कडे घातले.

बाबा आमटयांच्या ठायी ठायी सेवाभावी परमेश्वर दिसतो. खऱ्या परमेश्वरानेही एवढी दिन–दुबळयांची, आदिवासींची व कुष्ठरोग्यांची सेवा केली नसेल. त्यांच्या सेवाभावी व्रताच्या तपश्चर्येतूनच आनंदाची बरसात करणारा " आनंदवना " सारखा पृथ्वीवरील स्वर्ग चंद्रपूरच्या निर्जन अरण्यात अवतरला. केवळ भारतमातेलाच नव्हे तर जगातील साऱ्या मानवजातीला ललामभूत ठरणारे ' आनंदवन ' हे जिवंत तीर्थक्षेत्र बनले आहे. ज्यांचे पाय श्रमलेल्या आनंदवनाच्या मातीला लागतील ते पावन होतील. इथे आनंदवनाचे दर्शन घ्याल तर काशी किंवा पंढरपूरच्या तीर्थस्थळांपेक्षाही अधिक श्रद्धावान बनाल यात शंका नाही.

समाजातील उपेक्षितांतील उपेक्षितांचे अश्रू पुसण्याचा ध्यास घेतलेल्या एका त्यागी महामानवाचा आपल्या देशात जन्म व्हावा यापेक्षा मोठी ती देणगी कोणती ? बाबा म्हणजे नक्षत्रांचं देणं. म्हणूनच देश–परदेशातील सर्वांना बाबाबद्दल सार्थ अभिमान वाटतो. त्यांच्या कार्यात त्यांचाही प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहभाग लाभत आहे. ज्यॉबुल्हर या फ्रेंच प्रतिभावंताने बाबांच्या आनंदवनाची शौर्यगाथा गायिली आहे.

" चंदेरी ताऱ्यांच्या प्रकाशात
तू पुन्हा जन्म घेणार असलास तर . . .
हे आकाश पुत्रा, रूपेरी हिमशिखरांनी
जिची शीर्षरेषा सजवली आहे अन् . . .
जिच्या निमुळत्या पायथ्याशी
महासागराचे संगम आश्रयाला आले आहेत
त्या पुण्यभूमीत ये ,
महारोगाच्या शापानं कृतीशील बनलेले पांगळे हात
तुझ्या पाळण्याची वीण घालतील
तू बघ, अंधार उजळून टाकणाऱ्या
दीपज्योती सारखी लख्ख मने
तुझ्या स्नेह स्वागतासाठी उभी असतील
दु:ख जाणणाऱ्यांच्या आनंदाश्रूंचे पहिले
मंगल स्नान तुला घालतील. "

केवढा मोठा आदरभाव यात व्यक्त झाला आहे. बाबांची वाणी म्हणजे प्रत्यक्ष स्त्रवणारे अमृतच. स्वर्गातून हे भरलेले अमृतकुंभ झडप घालून आणणारे

आशावादी आणि जबरदस्त इच्छाशक्ती असणारे सामर्थ्यवान पंख बाबाना लाभले आहेत. नवनिर्मितीच्या नादाने झपाटलेले तरुण त्यांना हवे आहेत. आता गोगलगायीच्या गतीने साथीला आलेले दैन्य टाळून अणुयुगातील नवतंत्र वेगाने आत्मसात केले पाहिजे. हीच दिशा, हीच ईर्षा व हेच ध्येय त्यांच्या त्यागी जीवनात दिसते. अग्निपुष्प मध्ये तर त्यांच्या ध्येयवादी जीवनाचा साक्षात्कार ' मी अजून जहाज सोडलेले नाही ' वरून होते.


" समाजकार्याची ही आंबट कैरी
खाता-खाता दात आंबून गेले आहेत
तरी ती सोडवत नाही.
राजकीय पाणबुडे कोणत्या क्षणी जहाजाला सुरूंग
लावतील याचा नेम नाही. पण बुडण्याची खात्री
वाटू लागली तरी माझे हे जहाज मी सोडणार नाही.
कारण, त्यावर माझी सगळ्यात जास्त प्रीती आहे.
बुडत्या कर्णधारालाही ओढ असते घराची.
पण प्रसंग येतो तेव्हा घर बाजूला पडते.
जहाजाबरोबर बुडवून घेणारे कर्णधार जेथे असतात
तेथेच बुडता देश वाचविणाऱ्या नाविकांच्या पिढ्या
जन्म घेतात.
वाट पहाणाऱ्या किनाऱ्यांना
आणि लाटांच्या उग्र कल्लोळास कळू द्या
मी अजून जहाज सोडलेले नाही ! "

अशा या कर्मयोग्याचे हे खडे बोल ऐकल्यावर संकटातही धीर येईल. रस्त्याच्या कडेला गटार गंगाजळीत पडलेल्या व आपले सडलेले अवयव जगवीत असणाऱ्या महारोग्यांच्या ठायी बाबाना मानवतेचा साक्षात्कार होतो. चार-दोन पैसे अंगावर फेकणारे हात त्या महारोग्याला हृदयाशी कवटाळतात आणि जीवनभर साथ करतात. तेच हात, भरतीच्या लाटांनी जीवनाला आलिंगन देतात आणि ओहोटीच्या हातांनी त्याचा पदस्पर्श करतात. आशियाचे नोबेल पारितोषिक मानल्या जाणाऱ्या ' रॅमन मॅगेसेसे ' पुरस्कारासाठी एका ' विराट ' मानवाची निवड झाली ती म्हणजे थोर समाजसेवक आदरणीय बाबा आमटे यांची होय. आनंदवासियांना जो आनंद होत आहे तोच माझ्याही मनात ओसंडून वाहत आहे.

जीवनाच्या उतरणीवर विकलांग अवस्थेत असतानाही त्यांना देशातील जातीभेद, प्रांतभेद यांचे सतत घोंघावणारे वादळ अस्वस्थ करीत होते. अंधश्रद्धेतून होणारी धर्मभावना, फुटीरवादी प्रवृत्ती यामुळे देश तोडला जातो की काय ही भीती त्यांना सदैव बोचत आहे. म्हणूनच आपण एक खारीसारखा पण प्रामाणिक प्रयत्न करून पहावा याच शुद्ध भूमिकेने त्यांनी देशाच्या अखंडतेसाठी ' भारत जोडो ' अभियानास प्रारंभ करून संपूर्ण भारतभर प्रवास केला. त्यांचा हा प्रयत्न स्तुत्य असाच आहे. २४ डिसेंबर १९८५ रोजी शेकडो युवक युवतींना बरोबर घेऊन या अभियानास प्रारंभ झाला. कन्याकुमारीचे त्रिसंगम गंगातीर्थ घेऊन उत्तरेकडे १४ राज्यांतून ' एकतेचा ' संदेश देत आणि लोकांच्या मनातील संकुचितपणा, उदासिनता नष्ट करीत ही यात्रा निघाली आहे. ' भारत जोडो, भारत जोडो ' हे एक आव्हान असणारे अभियान संपूर्ण एकसंघ भारत उभारू शकले नाही तरी देशाचे भवितव्य आणि आशा असणाऱ्या तरुण पिढीला एकतेच्या ध्येयाचे आव्हान ठरेल.

असा हा एक महान तपस्वी, कर्मयोगी आमच्या देशात खऱ्या अर्थाने सत्यं-शिवम्-सुंदरम्‌ची आराधना करीत आहे.

‡ ‡ ‡



# शाहबानो प्रकरण आणि मुस्लिम समाज

कु. श्रीप्रभा राजेशिर्के
द्वितीय वर्ष कला

देशाच्या कानाकोपऱ्यात गाजत असलेल्या शाहबानो प्रकरणाने उठलेला हल्लकल्लोळ अद्याप चालूच आहे. शाहबानोच्या पोटगीच्या निर्णयाने मुस्लिम समाजात प्रचंड गहजब उडाला. हा निर्णय आपल्या स्वार्थाआड येतोय असे दिसताच लगेच त्यांनी तो 'शरीयत' विरुद्ध ठरवला. धर्मवेड्या मुसलमानांना नकोशा झालेल्या मुस्लिम सत्यशोधक समाजाने मात्र या निर्णयाचे स्वागत केले. त्यामुळे त्यांच्या असुयेत आणखी भर पडली. त्यांना हे धर्मसंकट वाटू लागलंय. मुस्लिम सत्यशोधक समाजाने मुस्लिम स्त्रियांच्यात जागृती व्हावी अशा उदात्त हेतूने या निर्णयाचा प्रचार करावयास सुरुवात केल्याचे पाहताच धर्मांध मुसलमान अधिकच संतापले. गावोगांवी मुसलमानांनी प्रचंड मोर्चे काढले, निदर्शने केली. 'इस्लाम खतरे में' 'शरीयत बचाव' च्या घोषणा देऊन अकारण कांगावा करायला सुरुवात केली. भारतामध्ये घडत असलेल्या अनेक खऱ्या–खोट्या घटनांचा बाऊ करून आपल्या धर्मबांधवांच्या मनात सूडाची भावना पेटवून दिली. शाहबानो प्रकरणी हिंदूंचा हात असल्याचा दावा त्यांनी केला.

वास्तविक शाहबानो प्रकरणाने जागृतीची चालून आलेली संधी त्यांनी हकनाक घालवली. जग २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असताना मुस्लिम समाज ६ व्या शतकाकडे परतू लागलाय. म्हणूनच त्यांचे आजपर्यंत नुकसान होत आले आहे. इस्त्रायल सारख्या छोट्या पण अतिप्रगत राष्ट्राने अरबांना वारंवार पराभूत केलं ते यामुळेच. जग चंद्रावर पोचलं तरी हे अजून कुराणातील कानामात्रा वाकडी करु द्यायला तयार नाहीत. नुकतेच इराणमध्ये एका शाळकरी मुलीने लिपस्टिक लावली म्हणून तिला गोळी घालून ठार करण्यात आले. या साऱ्या घटना काय दर्शवतात तर मुस्लिम समाज दिवसेंदिवस संकुचित व राष्ट्रीय प्रवाहापासून अलग होऊ पहात आहे. हाजी मस्तान सारख्या स्मगलरला शरीयतप्रमाणे शिक्षा द्यावी अशी मागणी ते कां करीत नाहीत? त्यावेळी त्यांना भारतीय कायदा चालतो. फक्त कुटुंबनियोजन, बहुभार्या प्रश्न किंवा पोटगी यावेळी मात्र त्यांना शरीयतची आठवण का होते हे समजत नाही.

शरीयतमध्ये ढवळाढवळ चालूच ठेवत असाल तर मग त्याच्या परिणामांनाही तयार रहा असा सरळ सरळ इशारा त्यांनी सरकारला दिलाय. सर्वात आश्चर्याची गोष्ट अशी–नुकताच दिल्लीत शरीयत बचाव कमिटीतर्फे ऐंशी हजार मुसलमानांच्या उपस्थितीत एक मेळावा झाला. तेव्हा उपस्थित असलेल्या साऱ्या मुसलमानांनी हात उंचावून 'जिहाद' साठी तयारी दर्शवली. 'हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्थान' च्या घोषणांही त्यांनी मुक्त स्वरात दिल्या. तरीसुद्धा राज्यकर्ते स्वस्थ कसे ? सरकारने या प्रकरणी काहीतरी खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे. जगातील कोणत्याही प्रगत राष्ट्रात जाती–धर्म–पंथ यावर आधारलेला नागरी कायदा आस्तित्त्वात नाही. सगळ्या राष्ट्रांत सर्व नागरिकांसाठी एकच समान नागरी कायदा अस्तित्त्वात आहे.


भारत हे त्याला अपवाद असलेले एकमेव राष्ट्र होय.

शेंवटी आपल्यासारख्या सामान्य जनतेनेच याविरुद्ध उभं राहिलं पाहिजे. हिंदू विरूद्ध मुसलमान असं या लढ्याचं स्वरूप नाही. समान नागरी कायदा मान्य असलेल्या सगळ्या भारतीय नागरिकांनी हिंदू मुसलमानांनी एकत्र येऊन धर्मांध मुसलमानाना खडा सवाल विचारायला हवा.

शेकडो वर्षे खैबर खिंडीतून आलेली अनेक आक्रमणे पचवून आज भारत उभा आहे, हे त्यांनी विसरू नये. निदान 'खलिस्तान' प्रकरणावरून तरी त्यांनी धडा घ्यावा. भारतामध्ये राहवयाचे असेल तर समान नागरिकत्वाची रास्त भूमिका त्यांना मान्य करावीच लागेल. देशाच्या घटनेप्रमाणेच त्यांना वागावे लागेल. यात तडजोड करता कामा नये. आज शाहबानो प्रकरण झाले, उद्या आणखी एखादे नवे प्रकरण निघेल.

ज्वालामुखीच्या उद्रेकापूर्वी भूकंपाचे सौम्य हादरे बसावेत, तशीच ही अवस्था आहे. कारण येत्या काही वर्षात मुस्लिम खंबायतच्या आखातात दुसरं पाकिस्तान मागतील अशी भविष्यवाणी केली जाते. तो दुर्दैवी प्रसंग भारतासारख्या उदार राष्ट्रावर न येवो हीच परमेश्वर व अल्लाच्या चरणी प्रार्थना !

‡ ‡ ‡

'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

**राजाराम शंकर मसुरकर**

जनरल मर्चंट अँड कमिशन एजंट

**फोंडाघाट**, जि. सिंधुदुर्ग.

**फर्म-मे. मसुरकर आणि कंपनी** फोंडाघाट ☎ २८

'रसराज' ला हार्दिक शुभेच्छा !

**सुबक झेरॉक्स प्रतीसाठी**

**राधाकृष्ण झेरॉक्स**

**देवगड सडा, देवगड, जि. सिंधुदुर्ग**

**प्रोप्रा. कृष्णकांत द. धुरी**



'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

**जनता क्लिनिक**

**पार्वती सूतिकागृह गिर्ये व विजयदुर्ग**

डॉ. आर्. एम्. पोकळे

सर्व प्रकारच्या पेशंटसाठी विजयदुर्ग परिसरातील एकमेव सुसज्ज हॉस्पिटल. प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या रविवारी**

**डॉ. अ. म. देसाई M. D. यांचा सल्ला**

# श्रीलंकेतील वांशिक समस्या

**अविनाश खडपकर**
तृतीय वर्ष कला

गेल्या शतकातील साम्राज्यवादाने अनेक जटिल प्रश्न निर्माण केले. ब्रिटिशांच्या जगभर वसाहती पसरलेल्या होत्या. वसाहतीचे आर्थिक शोषण करण्यासाठी त्या देशातील खनिज संपत्तीचे उत्खनन करणे या सारख्या मार्गाचा अवलंब करण्यात आला. काही देशांमध्ये मजूरवर्ग कमी किंवा अकुशल असल्याने इतर वसाहतीतील लोकांचे स्थलांतर करण्यात आले. पुढे त्या वसाहती स्वतंत्र झाल्या. परंतु त्याठिकाणी स्थलांतरीत झालेले लोक स्थायिक झाले. बऱ्याचदा बाहेरून आलेले लोक हे स्थानिक लोकांपेक्षा भाषा, धर्म, वंश या बाबतीत भिन्न असल्यामुळे मुळच्या रहिवाशांना ते परके वाटतात. कोणत्याही राष्ट्राच्या निर्मितीसाठी समान धर्म, भाषा, वंश यांची गरज असते. परंतु वरील भिन्नतेमुळे स्थलांतरीत लोक त्या देशात समरस होऊ शकले नाहीत. आशियातील इतर देशांप्रमाणेच भारतातून मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या कारणांसाठी स्थलांतर झाले.

## वांशिक प्रश्नाचे स्वरूप

वर उल्लेख केल्याप्रमाणे सांस्कृतिक फरक हा या समस्येतील महत्त्वाचा भाग असला तरी त्याला आणखी काही आर्थिक घटक कारणीभूत ठरलेले आहेत. आशियातून वेगवेगळ्या देशांमध्ये गेलेल्या या लोकांनी आपल्या कष्टाने, मेहनतीने आणि कौशल्याने आपला जम बसवला. व्यापार, उद्योगधंदे यांसारख्या प्रमुख आर्थिक उलाढालीमध्ये त्यांचे वर्चस्व निर्माण झाले. या लोकांच्या वाढत्या श्रीमंतीमुळे स्थानिक लोकांना त्यांचा हेवा वाटू लागला. त्यातूनच संघर्ष आणि द्वेष या भावना अधिक तीव्र होऊ लागल्या. भारतातून प्रामुख्याने द. आफ्रिका, इंग्लंड, श्रीलंका, वेस्ट इंडीज व आफ्रिकेतील इतर देश या देशांमध्ये बरेच लोक त्याकाळात स्थलांतरीत झाले होते. आज इंग्लंडसारख्या विकसित देशात बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याने भारतीय लोकांना तेथे विरोध वाढत आहे. तीच परिस्थिती दक्षिण आफ्रिकेत निर्माण झालेली आहे. त्यामुळे या देशांमध्ये अधून मधून हिंसक दंगलींचा उद्रेक होत असतो.

## श्रीलंकेतील प्रश्न

श्रीलंकेतील मूळचे रहिवासी बौद्ध धर्माचे आहेत. तसेच ते सिंहली वंशाचे आहेत. परंतु इंग्रजांच्या राजवटीत श्रीलंकेतील चहा, कॉफीच्या मळ्यांमध्ये कामगार म्हणून हजारो भारतीय लोक गेले. ते सर्व तामीळ भाषिक आहेत. आज या देशातील व्यापार, व्यवसाय यातील आर्थिक नाड्या ह्या तामीळ लोकांच्या हातात आहेत. तामीळ लोकांच्या आर्थिक संपन्नतेचा सिंहलींना हेवा वाटतो. कारण बहुसंख्य सिंहली समाज हा दरिद्री आहे.

बऱ्याच वर्षांपासून धगधगणाऱ्या ह्या समस्येचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे कित्येक वर्षांपासून श्रीलंकेत वास्तव्य करुन असलेल्या भारतीय वंशाच्या लोकांना अद्याप त्या देशाचे नागरिकत्व मिळालेले नाही. तेथील सरकार या जबाबदारीची टाळाटाळ करीत आहे.

श्रीलंकेच्या उत्तरेकडील जाफना हा विभाग तामीळ भाषिक लोकांची जास्त वस्ती असलेला आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या या संघर्षात आता जाफना विभागात स्वतंत्र तामीळ राज्याची मागणी पुढे आली आहे.

## सध्याची परिस्थिती

गेल्या वर्षभरात श्रीलंकेतील हिंसाचाराला ऊत आलेला आहे. या संघर्षात तामीळ बंडखोर आणि श्रीलंकेचे लष्कर हिंसाचाराचा अवलंब करीत आहेत. अतिरेक्यांच्या कारवायांचा बीमोड करण्याच्या नावाखाली हजारो निरपराध तामीळ लोकांची कत्तल केली जात आहे. त्यासाठी लष्कर बळाचा वापर मोठ्या प्रमाणात करीत आहे. त्यामुळे हजारो तामिळांना आपली घरे दारे सोडून छावण्यांचा आश्रय घ्यावा लागत आहे. त्यातच स्थानिक सिंहलींकडून त्यांच्यावर सतत हल्ले होत आहेत. तामिळींच्या मालमत्तेचे नुकसान करणे, जाळपोळ करणे यासारख्या घटना सतत घडत असल्याने हा प्रश्न अधिक गंभीर बनलेला आहे.

## श्रीलंका सरकारची भूमिका

या समस्येच्या गुंतागुंतीला दोन्ही पक्ष कारणीभूत आहेत. तामीळ बंडखोरांनी फुटिरतावादी वृत्तीचा त्याग करावा तरच त्यांच्याशी बोलणी केली जाईल हा श्रीलंकेचा आग्रह आहे. तामीळ अतिरेक्यांनी स्वतंत्र राज्यासाठी चालविलेला सशस्त्र संघर्ष आणि तो दडपण्यासाठी लष्कराचा वापर सरकार करीत आहे. तामीळ संघटनांनी शांततामय मार्गाने आपल्या मागण्या मांडणे आवश्यक आहे. परंतु त्यांना सिंहलींकडून मिळणाऱ्या अमानुष वागणुकीमुळे ते संघर्षाला प्रवृत्त झालेले दिसतात. परंतु श्रीलंकेसारखा छोट्या देशाचे विभाजन करून स्वतंत्र राज्याची निर्मिती करणे कदापिही समर्थनीय ठरू शकत नाही. याचा तामीळ संघटनांनी विचार करण्याची गरज आहे.

## तामीळ प्रश्न : भारताला काय वाटते ?

जगातील कोणत्याही भागात असलेल्या भारतीयांचे रक्षण करणे हे भारत सरकारचे कर्तव्य आहे. भारतीयांची श्रीलंकेतील अमानुष कत्तल पाहता भारताला चिंता वाटणे स्वाभाविक आहे. राजीव गांधींनी वेळोवेळी भारताची भूमिका स्पष्ट केलेली आहे. बऱ्याचदा भारताने लष्करी हस्तक्षेप करून हा प्रश्न सोडवावा असा विचार व्यक्त केला जातो. परंतु तो प्रश्न पूर्णपणे श्रीलंकेचा अंतर्गत प्रश्न आहे आणि दुसऱ्या देशाच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करणे हे भारताचे धोरण आहे. महत्त्वाचे म्हणजे पंजाब प्रश्नाच्या स्वरूपात त्याचा विचार भारत करतो. स्वतंत्र खलिस्तानची मागणी भारत कोणत्याही किमतीवर मान्य करू शकत नाही. त्यामुळे स्वतंत्र तामीळ राज्याला भारत कधीही पाठिंबा देऊ शकत नाही.

‡ ‡ ‡

रसराजला हार्दिक शुभेच्छा !

टेलर सिलेक्शन
जेण्टस् स्पेशालिस्ट
मु पो. ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग
प्रोप्रा. पवार बंधू

# भौगोलिक सहल : सुखद अनुभूती

**कु. अंजली नलावडे**
तृतीय वर्ष कला

दि. २३ सप्टेंबर १९८५ रोजी आम्ही भूगोल विषयाच्या अभ्यासाचे एक महत्त्वपूर्ण अंग असलेल्या भौगोलिक सहलीला देवगडहून प्रयाण केले. सायंकाळी ६ वा. कोल्हापूरला पोहोचलो. तेथे कडकडीत ' कोल्हापूर बंद ' ने आमचे स्वागत केले. अर्थात कोल्हापूरचे जनजीवन विस्कळीत झाले तरी त्याचा आमच्या सहलीवर विपरीत परिणाम झाला नाही. कारण कोल्हापूरला आमचा नियोजित कार्यक्रम नव्हता. सकाळी गुलाबी थंडीत कऱ्हाडला जाण्यासाठी निघालो. स्वतःचे वाहन नसल्यामुळे नेहमीच वेळेवर न सुटणाऱ्या एस. टी. बसवर पुढील कार्यक्रम अवलंबून होते. सकाळी ठीक ७ ०० वाजता कऱ्हाडला निघालो. कोल्हापूर ते कऱ्हाड साधारणतः दोन तासाचा प्रवास आहे.

## कृष्णा कोयनेचा प्रीतीसंगम

कऱ्हाड म्हटल्यावर आमच्या समोर प्रीतीसंगम उभा राहतो. तेथे महाराष्ट्राच्या दोन महान नद्या एकमेकींना भेटतात. एक म्हणजे महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी कोयना आणि दुसरी कृष्णा. अनेक नद्या एकत्र मिळतात परंतु परस्परांना समोरासमोर या नद्या भेटत असल्यामुळे हा संगम वैशिष्टचपूर्ण ठरला आहे. याच ठिकाणी महाराष्ट्राचे एक सुपुत्र कै. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मारकाचे दर्शन घेतले.

## कोयना नगर

आज भारतात उद्योगधंद्यात महाराष्ट्र हे एक आघाडीचे राज्य आहे आणि महाराष्ट्राच्या उद्योगधंदचाच्या उभारणीत कोयना जलविद्युत प्रकल्पाचे महत्त्वाचे स्थान आहे. १९५४ मध्ये या धरणाचे बांधकाम पूर्ण झाले. धरणाची उंची ८५ मी. एवढी असून जवळजवळ तेवढीच त्याची लांबी आहे. कोयनानगरचा परिसर पाहून झाल्यावर आम्ही रात्री साताऱ्याला निघालो.

## महाबळेश्वर – पर्यटन केंद्र

महाबळेश्वर एक निसर्गरम्य असे ठिकाण आहे. या ठिकाणी असलेली गर्द वनश्री आणि डोंगरदऱ्या निसर्गप्रेमी आणि हौशी पर्यटकांना सतत आकर्षित करीत असतात. भौगोलिकदृष्टचा महाबळेश्वराचे स्थान अद्वितीय आहे. सरासरी ४५०० फूट उंची असलेले हे पहाड जांभ्याच्या (Laterite) खडकाचे बनलेले आहेत. तसेच या परिसरात पाच नद्या उगम पावतात. कृष्णा, कोयना, साविञी, वेण्णा आणि तरळी या त्या नद्या आहेत. तसेच या अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांना मिळणाऱ्या नद्यांचा जलविभाजक या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतो. आर्थर सीट, विल्सन पॉईंट, बॉम्बे पॉईंट यासारखी अनेक आकर्षक स्थळे येथे आहेत.

## पाचगणी – गिरीस्थानाची राणी

पाचगणीचे पठार (Table Land) चार हजार फूटांहून अधिक ऊंच असलेले Lateritic Plateau आहे. याचे महत्त्वपूर्ण वैशिष्टच म्हणजे या पठारावर आपल्याला एक फुटाचा देखील चढउतार दिसून येत नाही. म्हणूनच त्याला Table Land असे म्हणतात. एकूण पाच लहान मोठी पठारे या परिसरात

असल्यामुळे त्या ठिकाणाला 'पाचगणी' असे नाव मिळाले आहे. पाचगणीच्या हिरव्यागार वनराई आणि अल्हाददायक हवामानामुळे ते पर्यटन केंद्राबरोबरच महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनले आहे.


पाचगणीचा परिसर पाहून आम्ही वाई मार्गे पुण्याच्या दिशेने निघालो. वाई, प्राचीन भव्य देऊळ आणि कृष्णेच्या पवित्र स्पर्शाने पावन झालेले आहे. वाईहून पुढे खंबाटकीच्या घाटातून नीरेच्या खोऱ्यात प्रवेश केला. नीरेचा हा परिसर सधन अणि संपन्न वाटला. तसेच उद्योगधंद्याच्या विकासाला येथे उत्कृष्ट परिस्थिती आहे. पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग आणि नीरा नदीतून होणारा मुबलक पाणीपुरवठा, यामुळे येथे कारखान्यांची गर्दी वाढत आहे. तसेच पुण्याजवळच्या परिसरात विशेषतः खेड, शिवापूर, शिरवळ याठिकाणी पालेभाज्या, फळफळावळ यांची लागवड बऱ्याच मोठ्या प्रमाणात केलेली आहे.

पुण्यात पोहोचल्यावर विश्रांतीसाठी पुणे विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसरात गेलो. विद्यापीठ परिसरामध्ये मनसोक्त हिंडलो. तेथे भूगोल विभागाला व भूशास्त्र विभागाला (Geology Dept.) भेट दिली. भूशास्त्र विभागाचे म्युझिअम आश्चर्यकारक होते. दुसऱ्या दिवशी पुणे दर्शनाला निघालो. पुण्यातील सारसबाग, पर्वती, पेशवेपार्क या प्रेक्षणीय स्थळांना भेट दिली. तसेच केळकर संग्रहालयाच्या विविध वस्तूंचे निरीक्षण केले. या व्यतिरिक्त भारतीय हवामान विभागाची वेधशाळा आणि खडकवासला धरण या भौगोलिक स्थळांची पाहणी केली.

हा प्रवास, प्रवासातील अनुभव, एकमेकांच्या अडचणी आणि सामुहिकपणे पाच दिवसांचा कालावधी सर्व काही संपणार होते. परंतु प्रवास संपला तरी सहलीच्या विविध स्मृती मात्र मनात दीर्घकाळ राहणार होत्या. या विचारांनीच पुणे सोडले.ही संपूर्ण सहल म्हणजे एक सुखद अनुभूतीच ठरली.

‡ ‡ ‡


'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !




**निर्मला गोपाळ नेने**

**फोन नं. ६९**

**देवगड.**

'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !



**मे. अमृत विष्णू नलावडे**

**जनरल मर्चंट, देवगड**

**ता. देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग**

# देवगड पवनचक्की

**कु. वासंती राऊत**
तृतीय वर्ष कला

ग्रामीण परिसराच्या विकासात 'उर्जेचे' स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात चेहरा–मोहरा बदलण्याची किमया अवघ्या काही वर्षात ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात झालेल्या भरीव प्रगतीमुळे घडून येऊ शकली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड येथे 'सीतबांवची काठी' नावाने परिचित असलेल्या भागात आता पवनचक्क्याद्वारे विद्युत निर्मिती करण्याचा प्रयत्न लवकरच कार्यान्वित होत आहे. या प्रकल्पाविषयी अधिक माहिती देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

पवनचक्क्या उभारण्याच्या राष्ट्रीय कार्यक्रमास यापूर्वीच चालना देण्यात आली आहे. आतापर्यंत प्रामुख्याने पवनचक्क्यांचा उपयोग कृषीसिंचनासाठी, खेड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी व मीठागरात पाणी आणण्यासाठी केला जात होता. आता पवनचक्क्यांच्या माध्यमातून विद्युत निर्मिती करण्याच्या नव्या उपक्रमाबरोबरच ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रात पुढचे पाऊल टाकले जात आहे.

## विद्युत निर्मितीस त्वरीत प्रारंभ

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 'देवगड' हे एक तालुक्याचे ठिकाण आहे. देवगड शहराच्या लगतच पश्चिमेस विस्तीर्ण अरबी समुद्र पसरलेला आहे. शहर व समुद्रकिनारा यांच्या दरम्यान 'सीतबांवची काठी' या ऊंचावरील परिसराची या प्रकल्पासाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे हा प्रकल्प पुढील काही महिन्यातच कार्यान्वित केला जाणार असून त्यासाठी सुमारे १॥ कोटि रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. वीज मंडळाचे तज्ज्ञ व अधिकारी तसेच इतर तज्ज्ञांनी या जागेस भेट देऊन प्रकल्प स्थळांची निवड केली आहे. एकूण ५०० किलो वॅट क्षमतेचा हा प्रकल्प असून त्याकरिता १० पवनचक्क्या उभारल्या जाणार आहेत. प्रकल्पाच्या उभारणीचे काम विद्युत मंडळातर्फे त्यांच्या तज्ज्ञ कारागिरांकडून केले जाणार आहे. सागरी किनारपट्टीच्या भागात वेगवान वारे वाहात असतात. हे गृहीत धरूनच हा प्रकल्प प्रायोगिक स्वरुपात उभारण्यात येणार असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात आले. देवगड प्रकल्पाच्या उभारणी बरोबरच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण, विजयदुर्ग, वेंगुर्ला, आचरा इत्यादि किनारपट्टीच्या ठिकाणीही याच पद्धतीने पवनचक्क्या बसविण्याची योजना आहे. त्यादृष्टीने बेंगलोरच्या नॅशनल एरॉनॉटीक लॅबोरेटरीच्या तज्ज्ञांनी येऊन या जागेची पाहणीही केली आहे.

## 'सीतबांवची काठी' परिसराची निवड

'सीतबांवची काठी' परिसरातील सुमारे ३० एकर क्षेत्राच्या परिसरात या प्रकल्पाची उभारणी केली जाणार आहे. प्रकल्पाच्या उभारणीसाठी परदेशी यंत्रसामुग्री मागविण्यात आलेली असून ती डेन्मार्क येथून मुंबईमार्गे देवगडला आलेली आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर दर ताशी ५०० युनिट विद्युत निर्मिती होऊ शकेल अशी अपेक्षा आहे. याद्वारे स्थानिकरित्या विद्युत निर्मितीत बरीचशी भर पडणार आहे. समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागात ज्या ठिकाणी हवेचे स्रोत अधिक प्रमाणात जाणवतात, अशा अन्य

ठिकाणीही अशाच स्वरुपाचे प्रकल्प उभारण्याची योजना आहे. त्या दृष्टीने ठिकठिकाणी पाहणीही केली जात आहे.

**पवनचक्की : उर्जानिर्मितीचे उत्तम माध्यम**

पवनचक्कीची क्षमता ही बदलत्या वाऱ्याच्या स्वरुपावर अवलंबून असते. विद्युत निर्मितीसाठी वाऱ्याचा वेग ताशी कमीत कमी १६ कि. मी. असावा लागतो. देवगड येथे तज्ज्ञांकरवी निरीक्षण करण्यात येऊन तेथील सरासरी ताशी वेग १८ ते २० कि. मी. असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. पवनचक्कीसाठी इंधन लागत नाही. या खेरीज पवनचक्कीचे तंत्र मध्यम स्वरुपाचे असल्याने देखभालीचा खर्चही खूपच कमी येतो. पवनचक्कीला सतत देखरेखीची जरुरी नसते. सामान्यत: एका पवनचक्कीचे वजन ४५० किलोग्रॅम इतके असते. उंची साधारणत: ७ मीटर, पाती १२, चक्राचा व्यास ५ मीटर इतका असतो. दोन पवनचक्क्या दरम्यान १५० फूट अंतर ठेवून वाऱ्यास अडथळा येणार नाही अशा बेताने परस्परांशी तिरकस पद्धतीने उभारणी केली जाते.

देवगड येथील एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या परिपूर्तीकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले असून हा प्रकल्प लवकर कार्यान्वित व्हावा अशी अपेक्षा आहे.




'रसराज'ला हार्दिक शुभेच्छा !

सर्व प्रकारच्या साड्या, कापड, मुलांचे
रेडिमेड कपडे, पॅन्ट व शर्टपीस,
टेर्लिंग मटेरियल यांचे
प्रमुख स्टॉकिस्ट



**त्रिमूर्ती क्लॉथ स्टोअर्स**
**देवगड (सिंधुदुर्ग)**

**प्रोप्रा. – मोहन दाजी चिंदरकर**



Best Compliments from



**J. K. BAGDAD**
**VIJAYDURGA**

TAL - DEOGAD

# हॅलेचा धूमकेतू

**कु. प्रवीणा सावंत**
द्वितीय वर्ष कला

धूमकेतूचे नाव घेतल्याबरोबर मनात नकळत भीतीची भावना निर्माण होते. आजच्या विज्ञानयुगात आपण हॅलेचे स्वागत वेगळ्या पद्धतीने करीत आहोत. पूर्वी धूमकेतू दिसला म्हणजे काहीतरी दैवी आपत्ती निर्माण होणार, दुष्काळ, धरणीकंप यासारखे नैसर्गिक संकट कोसळणार असे मानले जात असे. परंतु आजच्या शास्त्रीय प्रगतीमुळे आपण त्याचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न करीत आहोत. 'हॅलेचा धूमकेतू' ही एक अभूतपूर्व खगोलशास्त्रीय घटना आहे. कारण हॅले दर ७६ वर्षांनी पृथ्वीवासीयांची भेट घेत असतो.

## धूमकेतू म्हणजे काय ?

धूमकेतू हा आपल्या सूर्यमालेतील एक घटक आहे. त्याच्या उत्पत्तीविषयी मतभेद असले तरी सूर्यमालेतील इतर ग्रहांची निर्मिती झाली तेव्हाच धूमकेतू निर्माण झाले असावेत या विषयी अभ्यासकांमध्ये एकमत दिसून येते. धूमकेतूच्या अंतर्गत रचनेविषयी बराच अभ्यास झालेला आहे. प्रथम दर्शनी धूमकेतू भीतीदायक वाटतो. कारण आकाशाच्या क्षितिजावर दूरवर त्याचा पसारा पसरलेला असतो. धूमकेतुचे तीन मुख्य भाग पाडले जातात. खरे पाहता धूमकेतू हा वातावरणातील वेगळ्या प्रकारचे वायू आणि बर्फ यांचा गोळा असतो. सूर्यापासून फार दूर अंतरावर असताना तो गोठलेल्या किंवा बर्फाच्या स्वरुपात असतो. परंतु सूर्याच्या भोवती प्रदक्षिणा घालीत असताना जेव्हा तो सूर्याच्या जवळ येतो तेव्हा तो घनरूप अवस्थेतून वायूरूप अवस्थेत येतो.सूर्यकिरणांमुळे त्याच्या मागे शेपटी सारखा भाग चिकटल्यासारखा दिसतो. त्याचा केन्द्रभाग साधारणतः पाच किलोमीटर व्यासाचा असतो तर शेपटीची लांबी सूर्य आणि पृथ्वीतील अंतराएवढी असते.

## हॅलेची कामगिरी

एडमंड हॅले हा न्यूटनचा समकालीन गणितज्ञ होवून गेला. धूमकेतूचा अभ्यास करताना त्याला एका धूमकेतूने आकर्षित केले. १६८२ मध्ये पाहिलेला धूमकेतूच्या कक्षेचा आणि भ्रमणकालाचा विचार करताना त्याला असे वाटू लागले की १५३१ व १६०७ साली दिसलेल्या धूमकेतूची कक्षा ही त्याने पाहिलेल्या धूमकेतूशी मिळती जुळती आहे. यावरून त्याने वरील तिन्ही धूमकेतू वेगवेगळे नसून एकच असल्याचे ठामपणे प्रतिपादन केले. एवढेच नव्हे तर पुन्हा ७६ वर्षांनी म्हणजे १७५८ मध्ये तो पुन्हा दिसेल असे भाकीत केले. हॅले स्वतः पुन्हा हा धूमकेतू पाहू शकला नाही. परंतु त्याने हॅलेचे नाव अजरामर केले.

## हॅलेचे आगमन

या आधी १९१० मध्ये हॅले पृथ्वीच्या संपर्कात आला होता. तेव्हा पृथ्वी धूमकेतूच्या शेपटीच्या भागातून पार झाली होती. हॅलेच्या संपर्कामुळे पृथ्वीवरील सजीवांवर विपरीत परिणाम होतील असा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला होता. शेपटीतील विषारी वायूंचा प्रभाव पडणार असे मत व्यक्त करण्यात आल्याने जगातील सर्व भागात भीतीदायक वातावरण निर्माण झाले होते. परंतु सुदैवाने हॅलेच्या पिसाऱ्याचा कोणताही परिणाम झाला नाही. मात्र या वर्षातील आगमनापेक्षा तेव्हांचे हॅलेचे दर्शन विलोभनीय होते.

## हॅले विषयीच्या संशोधनाचे महत्त्व

सूर्यमालेच्या निर्मितीसंबंधी विचार करताना किंवा पृथ्वीच्या उत्पत्तीचे रहस्य उलगडण्याच्या कामी धूमकेतू मोलाचे सहाय्य करू शकतील असा शास्त्रज्ञांना विश्वास वाटतो. काहींच्या मते तप्त तेजोमेघापासून भ्रमणात जे लहानमोठ्या आकाराचे भाग वेगळे झाले व त्यापासून इतर ग्रहांची निर्मिती झाली. त्याचवेळी त्या द्रवपदार्थातील काही भाग हा धूमकेतूच्या रूपाने शिल्लक राहिला असावा. तसेच धूमकेतूची कक्षा लंब वर्तुळाकार असल्याने बराच काळ तो सूर्यापासून दूरवर गोठलेल्या अवस्थेत असतो. त्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारचे रासायनिक बदल होणे कठीण आहे.

इंग्लंडमधील शास्त्रज्ञ प्रा. हॉईल यांच्या मते पृथ्वीवरील सजीवांची उत्पत्ती धूमकेतूमुळे झाली असावी. सजीवांच्या उत्पत्तीसाठी आवश्यक असलेल्या जैव रसायनाचे आगमन हे धूमकेतूच्या माध्यमातून पृथ्वीवर झाले असावे. पृथ्वीवर अस्तित्वात असलेल्या मुलद्रव्यांतून या प्रकारच्या नैविक रसायनांची निर्मिती होणे कठीण आहे असे त्यांना वाटते. या पार्श्वभूमीवर हॅलेच्या संशोधनाचे महत्त्व वादातीत आहे.

## हॅलेचे प्राप्तपरिस्थितीतील आगमन

१९८५ या वर्षाला निरोप देताना हॅलेच्या आगमनाची चाहूल ही महत्त्वाची घटना लक्षात येते. डिसेंबर मध्ये हॅले पृथ्वीच्या जवळ येऊ लागला परंतु जानेवारी नंतर पुन्हा तो लांब गेला. या वेळी मात्र हॅलेचे दर्शन साध्या डोळ्यांनी घेणे शक्य झाले नसले तरी तो ११ एप्रिल रोजी पृथ्वीच्या जास्तीत जास्त जवळ येणार आहे. तो पृथ्वीपासून तेव्हा सहा कोटी किलोमीटर अंतरावर असेल. परंतु गेल्या आगमनाशी तुलना करता हे अंतर बरेच जास्त आहे. मागील भेटीत तो पृथ्वीपासून २ कोटी कि. मी. अंतरावर होता.

आजच्या अवकाश युगात हॅलेच्या संशोधनाकरिता अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प काही देशांनी हाती घतले आहेत. त्यात अमेरिका, रशिया, जपान, आघाडीवर आहेत. रशियाच्या ' व्हेगा ' या यानामार्फत हॅलेच्या केंद्राचे फोटो पाठविण्याचे काम सुरू झाले आहे. जपानच्या ' प्लनेट ए ' या मोहिमेत हॅलेच्या सभोवतालच्या हैड्रोजन वायूच्या ढगांचे निरीक्षण केले जाणार आहे.

